दैनिक
E-Mail:dainikmhavratt@gmail.com
# महावृत्त
संपादक-अशोक हनवते.मो-9421094991,7264079990




लातूर वर्ष ४ थे अंक २१८ वा बुधवार दि.१९ फेब्रुवारी २०२५ पृष्ठे ४ स्वागत मूल्य २ रू.

# वरात, मंडप सारे तयार, पण नवरदेवाचा पत्ताच नाही!

नवी दिल्ली : दिल्ली विधानसभा निवडणुकीचा निकाल लागून दोन आठवडे उलटत आले तरी राज्यात नवे सरकार स्थापन होऊ शकलेले नाही. दिल्लीत आम आदमी पक्षाचा पराभव करत स्पष्ट बहुमतासह सत्ता मिळवल्यानंतरही भाजपाला आपला मुख्यमंत्रिपदाचा चेहरा निश्चित करता आलेला नाही. असे असतानाही भाजपकडून दिल्लीतील प्रसिद्ध रामलीला मैदानामध्ये शपथविधीची तयारी करण्यात येत आहे. त्यावरून आम आदमी पक्षाने भाजपावर खोचक टीका केली आहे. वरात, मंडप सगळे काही तयार आहे. पण नवरदेवाचा पत्ताच नाही, असा टोला आपचे दिल्लीमधील प्रदेश



संयोजक गोपाल राय यांनी लगावला आहे.

दिल्लीमध्ये मुख्यमंत्र्यांची निवड करण्यासाठी भाजपाला होत असलेल्या उशिरावरून टीका करताना गोपाल राय म्हणाले की, भारताच्या इतिहासात असे पहिल्यांदाच घडत आहे. वरात तयार आहे. मंडपही तयार आहे. मात्र नवरदेव कोण असेल हेच भाजपाला ठरवता येत नाही आहे. गोपाल राय पुढे म्हणाले की, भाजपा सारं काही करत आहे. मात्र त्यांना मुख्यमंत्री ठरवता येत नाही आहे. आतापर्यंत भाजपने आपल्या विधिमंडळ पक्षाची बैठक बोलावलेली नाही. हे भाजपावाले पुढच्या पाच वर्षांत आणखी काही विक्रम रचतील. भाजपा अंतर्गत चढाओढ लपवण्याचा अयशस्वी प्रयत्न करत आहे. आता दिल्लीच्या जनतेला दिलेल्या आश्वासनांची पूर्तता भाजपाने केली पाहिजेत असा टोलाही गोपाल राय यांनी लगावला.

दरम्यान, दिल्ली विधानसभेच्या ७० जागांसाठी ५ फेब्रुवारी रोजी मतदान झाले होते. तर ८ फेब्रुवारी रोजी निकाल जाहीर झाले होते. त्यामध्ये भाजपने दणदणीत विजय मिळवताना ४८ जागा जिंकून स्पष्ट बहुमत मिळवले होते. तर मागच्या दहा वर्षांपासून दिल्लीच्या सत्तेत असलेल्या आम आदमी पक्षाला केवळ २२ जागांवर समाधान मानावे लागले होते.

## जागतिक बौद्ध धम्म परिषद उत्साहात संपन्न, स्वाभिमानाचे जीवन जगायचे गौतम बुद्धांनी शिकविले

किनवट/ शेख शौकत :- डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यामुळे आपण आज सन्मानाने जीवन जगतोय. तथागताने जीवन जगण्याचा उत्तम मार्ग म्हणजे बौद्ध धम्म दिला. त्यांचा हा विचार आज जगभर पोहोचला आहे. स्वाभिमानानं जीवन जगायचे गौतम बुद्धांनी शिकवले, असे प्रतिपादन राज्याचे सामाजिक न्यायमंत्री संजय शिरसाठ यांनी केले.




येथील समता नगर किनवट येथे बुद्धमूर्ती परिसर येथे १५ व १६ फेब्रुवारी असे दोन दिवस १४ व्या जागतिक बौद्ध धम्म परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. रविवारी धम्म परिषदेच्या शेवटच्या सत्रात अनन्य सन्मान या सत्रात मंत्री शिरसाठ म्हणाले, राज्यात २५ हजार विद्यार्थ्यांसाठी वसतिगृह निर्माण करण्याचा संकल्प केला आहे. त्यानुसार किनवट येथे सामाजिक न्याय विभागाचे वसतिगृहासाठी २० कोटी रुपये देत आहे. तीन महिन्यांत १०० मुलांचे वसतिगृह भूमिपूजन करण्यासाठी येतो. सहा ते नऊ महिन्यात वसतिगृह उभे झाले पाहिजे पुढच्या धम्म परिषदेला आलो तर स्वागत झाले पाहिजे. सूत्रसंचालन उत्तम कानिंदे यांनी केले. प्रास्ताविक द्या पाटील यांनी, तर अँड. सुनील येरेकर यांनी आभार मानले. यावेळी राजेश पाटील, बबन देशमुख, राजेंद्र झंजाळ आदींची उपस्थिती होती. संजय शिरसाठ सत्काराला उत्तर देताना बोलत होते. यावेळी आमदार भीमराव केराम अध्यक्षस्थानी होते. आमदार बाबूराव कदम, माजी आ. विजय खडसे यांची उपस्थिती होती.

# देशमुख कुटुंबाला न्याय मिळावा,फडणवीसांकडे पदर पसरणार

बीड : प्रतिनिधी राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट)च्या नेत्या आणि खासदार सुप्रिया सुळे यांनी मस्साजोग गावचे दिवंगत सरपंच संतोष देशमुख यांच्या कुटुंबीयांची भेट घेऊन त्यांचे सांत्वन केले. या भेटीनंतर आयोजित पत्रकार परिषदेत त्यांनी देशमुख कुटुंबाला न्याय मिळावा, यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे पदर पसरणार असल्याचे स्पष्ट केले.

सकाळी मस्साजोग येथे खासदार सुप्रिया सुळे यांनी संतोष देशमुख यांच्या कुटुंबीयांची भेट घेतली. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे (शरद पवार गट) नेते जितेंद्र आव्हाड, आमदार संदीप क्षीरसागर, खासदार बजरंग सोनवणे यांच्यासह इतर पदाधिकारी उपस्थित होते. संतोष देशमुख यांच्या हत्येला दोन महिने उलटून गेले असून, मुख्य आरोपी वाल्मिक कराड व त्याच्या सहका-यांना अटक करण्यात आली आहे. मात्र, कृष्णा आंधळे हा मुख्य आरोपी अद्याप फरार असून, सुदर्शन घुले याचा मोबाईलही पोलिसांच्या हाती लागलेला नाही. या प्रकरणाच्या तपासाबाबत ग्रामस्थांमध्ये नाराजी आहे.

पत्रकार परिषदेत बोलताना सुप्रिया सुळे म्हणाल्या, 'देशमुख कुटुंबाच्या दु:खाची कल्पनाही करता येणार नाही. त्यांच्या आई आणि बहिणींच्या वेदना पाहून मन सुन्न होत आहे. हा राजकारणाचा विषय नाही, तर माणुसकीचा मुद्दा आहे. या कुटुंबाला न्याय मिळावा म्हणून मी मुख्यमंत्र्यांची भेट घेणार आहे. ७० दिवस झाले तरी न्याय मिळत नाही, हे दुर्दैवी आहे.''



तसेच, त्यांनी राज्यातील कायदा-सुव्यवस्थेवर प्रश्नचिन्ह उपस्थित करत म्हटले, 'महाराष्ट्रात माणुसकी विसरली आहे का, असा प्रश्न माझ्या मनात निर्माण झाला आहे. मला मुख्यमंत्र्यांबद्दल मतभेद असले तरी देवेंद्रजींकडून मोठ्या अपेक्षा आहेत. मुख्यमंत्र्यांनी या प्रकरणात हस्तक्षेप करून आठ दिवसांत न्याय मिळवून द्यावा, अशी माझी अपेक्षा होती. छत्रपती शाहू महाराज, महात्मा फुले आणि बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांवर चालणा-या महाराष्ट्रात अशा गुन्हेगारीला थारा मिळू नये.' सुप्रिया सुळे यांनी बीड जिल्ह्यातील वाढत्या गुन्हेगारीवरही रोखठोक भूमिका घेतली. त्या म्हणाल्या, 'मी कुणालाही भेटणार नाही, मी कुणाकडूनही मॅनेज होणार नाही. आरोपींना फाशीची शिक्षा व्हावी यासाठी मी प्रयत्न करणार आहे. बीडमधील सत्तेची आणि पैशाची मस्ती उतरली पाहिजे. देशमुख कुटुंबाला न्याय मिळेपर्यंत मी स्वस्थ बसणार नाही. बीडमधील गुंडगिरी थांबलीच पाहिजे.' त्यामुळे या प्रकरणावर आता सरकार आणि प्रशासन काय भूमिका घेते, याकडे संपूर्ण राज्याचे लक्ष लागले आहे.



महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ,मुंबई मराठवाडा विभागीय अध्यक्ष अनिल सावंत लातूर जिल्हा दौऱ्यावर आले असता त्यांचे स्वागत करताना पत्रकार संघाचे प्रदेश उपाध्यक्ष अशोक देडे, जिल्हा सरचिटणीस अशोक हनवते, शहर जिल्हाध्यक्ष महादेव डोंबे, पत्रकार मनीष हजारे, गुडे, प्रसन्नजीत गायकवाड व विकास कांबळे दिसत आहे.

## शिवजयंती निमित्त जिल्ह्यात मद्यविक्री बंद

लातूर दि. १८: लातूर जिल्ह्यात १९ फेब्रुवारी २०२५ रोजी शिवजयंती साजरी करण्यात येणार आहे. जयंतीनिमित्त मिरवणुका, मोटार सायकल रॅली व इतर सामाजिक कार्यक्रम खुल्या, मुक्त तसेच निर्भय वातावरणात, शांततेत पार पाडण्यासाठी जिल्ह्यातील सर्व किरकोळ अबकारी मद्यविक्री अनुज्ञप्त्या बंद ठेवण्याचे आदेश जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी वर्षा ठाकूर घुगे यांनी दिले आहे.मुंबई मद्य निषेध कायदा १९४९ चे कलम १४२ तसेच नमूद कायद्यांतर्गत केलेल्या विविध नियमानुसार जिल्हाधिकारी श्रीमती ठाकूर - घुगे यांनी १९ फेब्रुवारी, २०२५ रोजी लातूर जिल्ह्यातील सर्व किरकोळ अबकारी मद्यविक्री अनुज्ञप्त्या बंद ठेवण्याचे आदेश दिले आहेत.



महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ,मुंबई यांच्यावतीने दैनिक एकमतचे व्यवस्थापक संदीप तिरुखे यांना आदर्श व्यवस्थापन पुरस्कार मिळाल्याबद्दल सत्कार करताना प्रदेश उपाध्यक्ष अशोक देडे, मराठवाडा विभागीय अध्यक्ष अनिल सावंत, जिल्हा सरचिटणीस अशोक हनवते, शहर जिल्हाध्यक्ष महादेव डोंबे, पत्रकार मनीष हजारे, प्रसन्नजीत जोगदंड दिसत आहे.

## निलंगेकर कुटुंबाचे माजी मंत्री दिलीपराव देशमुख यांच्याकडून सांत्वन

लातूर :- राज्याचे माजी मुख्यमंत्री दिवंगत डॉ शिवाजीराव पाटील निलंगेकर यांच्या पत्नी श्रीमती सुशीलाबाई पाटील निलंगेकर यांचे वृद्धापकाळाने रवीवारी दुःखद निधन झाले त्याबद्दल मंगळवारी राज्याचे माजी मंत्री सहकार महर्षी दिलीपराव देशमुख साहेब यांनी निलंगा येथे अशोका निवासस्थानी निलंगेकर कुटुंबाची भेट घेवून सांत्वन केले तत्पूर्वी दिवंगत श्रीमती सुशीलाबाई पाटील निलंगेकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार घालून अभिवादन केले यावेळी प्रदेश काँग्रेसचे सरचिटणीस अशोकराव पाटील निलंगेकर, डॉ शरद पाटील निलंगेकर, आमदार संभाजी पाटील निलंगेकर उपस्तीत होते यावेळी राज्य साखर महासंघाचे संचालक आबासाहेब पाटील जागृती शुगरचे उपाध्यक्ष लक्ष्मणराव मोरे, जिल्हा कोंग्रेसचे अध्यक्ष श्रीशैल्य उटगे,जिल्हा बँकेचे उपाध्यक्ष अँड प्रमोद जाधव मारुती महाराज साखर कारखान्याचे अध्यक्ष शाम भोसले, जिल्हा बँकेचे संचालक राजकुमार पाटील माजी संचालक संभाजी सुळ, बालाजी बिराजदार, सचिन दाताळ, हरिराम कुलकर्णी, मुकेश राजमाने, चांदपाशा इनामदार, विजयकुमार पाटील, डॉ अरविंद भातंबरे आदी उपस्थित होते



## काँग्रेसच्या प्रदेशाध्यक्षपदावर निवड होताच कार्यकारिणीत खांदेपालटाचे वारे

छ. संभाजीनगर : प्रतिनिधी सध्या महापालिका निवडणुकांच्या हालचाली सुरू आहेत. अशावेळी काँग्रेसमध्ये फेरबदल होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. लोकसभेत महाविकास आघाडी अंतर्गत काँग्रेसने चांगले काम केले.

दरम्यान, राज्य काँग्रेस कमिटीचे प्रदेशाध्यक्ष म्हणून हर्षवर्धन सपकाळ यांची निवड झाली आहे. आज त्यांनी काँग्रेस प्रदेशाध्यक्षपदाचा पदभार स्वीकारला. दरम्यान, 'नवा भिडू, नवा राज' याप्रमाणे स्थानिक कार्यकारिणीतही खांदेपालटाचे वारे वाहत असून, अनेक कार्यकर्त्यांनी यासाठी लॉबिंग सुरू केल्याची चर्चा आहे. बुलडाण्याचे हर्षवर्धन सपकाळ यांची प्रदेशाध्यक्षपदावर निवड झाल्यानंतर आता कार्यकारिणी बदलाची चर्चा सुरू झाली आहे.

राज्यभरासह छत्रपती संभाजीनगर शहर व जिल्ह्यातही बदल होणार असल्याचे बोलले जात आहे. नव्याने शहराध्यक्ष आणि जिल्हाध्यक्ष बदलले जाणार अशी चर्चा काँग्रेसच्या पदाधिकारी, कार्यकर्त्यांमध्ये केली जात आहे. त्यामुळे नव्याने शहराध्यक्षपदाच्या निवडीसाठी अनेकांच्या मनात पालवी फुटायला सुरुवात झाली आहे. लोकसभा निवडणुकांमध्ये जरी काँग्रेसने मविआसोबत



चांगली कामगिरी केली असली तरी विधानसभा निवडणूक काबीज करण्यात पक्षाला मोठे अपयश आले.

राज्यासह संभाजीनगर जिल्ह्यात पक्षाचा सुपडासाफ झाला. यामुळे येणा-या महापालिका निवडणुकीच्या अनुषंगाने नवे प्रदेशाध्यक्ष स्थानिक कार्यकारिणीत मोठे फेरबदल करण्याची शक्यता वर्तवली जात आहे. दरम्यान, इच्छुक उमेदवारांनी त्यासाठी वरिष्ठांकडे लॉबिंगदेखील सुरू केली असल्याचे सांगितले जात आहे.

## संपादकीय....

# गाझापट्टीतील नवा हलकल्लोळ

इस्त्रायलचे पंतप्रधान बेंजामिन नेतान्याहू यांच्या अमेरिका भेटी दरम्यान पत्रकार परिषद घेऊन अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी गाझापट्टी अमेरिका ताब्यात घेणार असा निर्णय घोषित केला.

'आम्ही इतिहास बदलू' असे बेंजामिन नेतान्याहू छातीठोकपणे सांगत असले तरीदेखील ट्रम्प इतिहास कसा बदलतील, मध्यपूर्वेचा भूगोल कसा बदलतील याविषयी शंका वाटते. कारण मध्यपूर्वेतील बहुतेक सर्व राष्ट्रे त्यांच्या या निर्णयामुळे अस्वस्थ झाली आहेत. आंतरराष्ट्रीय न्यायालयानेसुद्धा त्यांच्याविरुद्ध कारवाईचा बडगा दाखविला आहे. पण अमेरिका आणि इस्त्रायल यांनी आपण या कारवाईच्या प्रभाव क्षेत्रात नसल्याचे म्हटले आहे. ट्रम्प यांच्या या निर्णयाचे राजकीय पडसाद समजून घेणे आवश्यक आहे.

दीर्घकाळ युद्धात भरडल्या गेलेल्या २.३ लाख पॅलेस्टिनी नागरिकांच्या पुढे आता ट्रम्प यांच्या घोषणेने काही नवे प्रश्न निर्माण केले आहेत. गाझापट्टीतील नागरिकांच्या कथा आणि व्यथांमध्ये आता नवी भर पडत आहे. एकेकाळी संपन्न असलेली गाझापट्टी आता उद्ध्वस्त ढिगार्यात ओस पडली आहे. गाझापट्टीचे पुनर्वसन करायला १० वर्षांपेक्षा अधिक काळ लागेल. हे सारे कसे होणार? मृतांचा आकडा, जीवित व वित्तहानी पाहता, झालेले नुकसान कसे भरून निघणार असे अनेक प्रश्न अनुत्तरित आहेत. त्यातच ट्रम्प यांनी अमेरिका गाझापट्टी ताब्यात घेणार, त्यावर कब्जा करणार अशी विधाने करून आणखी नवे प्रश्न निर्माण केले आहेत.

युद्धानंतर इस्त्रायल गाझापट्टी अमेरिकेला सुपूर्द करेल. तेव्हा अमेरिका त्याचे निःशस्त्रीकरण करेल. तेथील जुने बॉम्ब, दारूगोळे निकामी करण्यात येतील. एवढ्या पुरते सारे ठीक आहे. पण या प्रदेशावर कब्जा करणे आंतरराष्ट्रीय संकेत आणि कायद्यानुसार खरोखर नैतिक ठरेल काय? अशा प्रकारच्या स्थलांतराला कोण आणि कशी मान्यता देईल असे अनेक प्रश्न उभे राहतात. अमेरिका गाझापट्टीचे पुनर्वसन करू इच्छिते पण त्या काळात तेथील निर्वासितांनी कोठे जायचे? बांधकाम प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर त्यांना तिथे येता येईल की नाही? की त्यांनी विस्थापित होऊनच शेजारील देशात राहायचे अशा अनेक प्रश्नांची मालिका त्यातून उभी राहिली आहे. व्हाइट हाउसने स्पष्ट केले आहे की विस्थापितांचे स्थलांतर ही तात्पुरती बाब असेल. परराष्ट्र सचिव मार्को रुबियो यांनी त्याचे वर्णन अंतरिम व्यवस्था असे केले आहे.

आंतरराष्ट्रीय राजकारणाच्या अभ्यासकांनी आणि विश्लेषकांनी ट्रम्प यांच्या विधानाबद्दल शंका घेतल्या आहेत आणि असे विश्लेषण केले आहे की, गाझापट्टीत यामुळे पुन्हा एकदा अस्थिरता निर्माण होत आहे. हमास-इस्त्रायलमधील तणाव संपण्यापूर्वीच त्याच्यात नव्याने पुन्हा भर पडत आहे. ट्रम्प यांची कल्पना लक्षात घेण्यासारखी आहे असे इस्त्रायलला वाटत असले तरी अन्य देशांची सहमती त्याला किती मिळेल हा खरा प्रश्न आहे. गाझापट्टीतील पॅलेस्टिनी प्रशासनाच्या स्वयंनिर्णयाचा हक्क कसा जपायचा? प्रस्तावात अनेक बाबी स्पष्ट नाहीत. मध्यपूर्वेतील बहुतेक सर्व इस्लामी राष्ट्रे आणि हमासची समर्थक राष्ट्रे या प्रस्तावाला उघड विरोध करणे साहजिक आहे. गाझापट्टीत कारखाने, रोजगार, उद्योग व्यवसाय यांचे भव्य स्वप्न ट्रम्प रेखाटतात. त्यांना गाझापट्टीत सागरतीरी भव्य प्रासाद (रिव्हिएरा) उभा करावयाचा आहे.

डोनाल्ड ट्रम्प यांनी पुनर्वसनाचा दिलेला हा प्रस्ताव किती कालोचित आहे, प्रसंगोचित आहे, याबद्दलही प्रश्न उपस्थित केले जात आहेत. ट्रम्प हे प्रॉपर्टी डेव्हलपर म्हणून प्रसिद्ध आहेत. आता त्यांना गाझापट्टीतील शाळा, इमारती, दवाखाने, कार्यालये या सार्यांची बांधणी करावयाची आहे. ही गोष्ट चांगली आहे. पण त्यामागील हेतूबद्दल जगाला शंका वाटणे साहजिक आहे. अमेरिकेच्या मध्यपूर्वेतील राजदूत स्टीव्ह विटकॉफ यांच्या मते, पुनर्वसनाचे काम दीर्घकाळ चालेल. त्यामुळे पॅलेस्टाइनमधील नागरिकांना कुठेतरी स्थलांतरित व्हावे लागेल.

ही गोष्ट अपरिहार्य आहे. गाझापट्टीतील मध्य व दक्षिणेकडील नागरिकांनी कायमचे प्रस्थान करावे हे म्हणणे किती संयुक्तिक आहे? त्यांना आपल्या मातृभूमीवर परतावे असे वाटणे साहजिक आहे. सागरतीरी भव्य प्रासाद (रिव्हिएरा) उभारण्याचे ट्रम्प यांचे स्वप्न मोठे आकर्षक आहे. परंतु त्या स्वप्नात गाझापट्टीतील निर्वासितांच्या भावना किती प्रतिबिंबित होतील? स्थानिकांच्या अनुपस्थितीत सुंदर स्वप्न उभारणे शक्य होईल काय? पण उभारणीनंतर त्यात त्यांचा किती वाटा असेल? आपल्या पत्रकार परिषदेत ट्रम्प यांनी धक्कातंत्राचा पुन्हा एकदा प्रत्यय आणून दिला. परंतु काही यक्ष प्रश्न अनुत्तरित आहेत. त्यामध्ये प्रामुख्याने चार प्रश्नांची नोंद करावी लागेल. त्यापैकी पहिला प्रश्न म्हणजे ट्रम्प खरोखरच गाझापट्टीवर अमेरिकन मालकी प्रस्थापित करू शकतील काय? अमेरिकेने निर्माण केलेल्या रिअल इस्टेटवर मालकी कोणाची असेल? अमेरिका फर्स्ट की पॅलेस्टिनी फर्स्ट हा दुसरा महत्त्वाचा प्रश्न आहे. पुनर्वसनाचे कार्य अमेरिका कुठून आणि कसे सुरू करणार हा तिसरा प्रश्न. तेथील लोकसंख्येला बेदखल करून गाझापट्टीचे पुनर्वसन करण्याने तेथील नागरिकांचा काय फायदा होईल? हा चौथा महत्त्वाचा प्रश्न. या प्रश्नांची उत्तरे दिल्याशिवाय ट्रम्प यांच्या प्रस्तावाला मूर्त रूप प्राप्त होणे अवघड आहे. याखेरीज सर्वांत महत्त्वाचा प्रश्न उरतो तो म्हणजे एकीकडे जागतिक संस्था-संघटनांमधून माघार घ्यायची, अमेरिका फर्स्टचा नारा द्यायचा आणि दुसरीकडे जागतिक समस्यांमध्ये अनाठायी हस्तक्षेप करायचा, यातून ट्रम्प महाशय गोंधळलेल्या अवस्थेत आहेत का, असा प्रश्न जगाला पडला आहे. या सर्व चर्चेवरून हे स्पष्ट होते की, अमेरिकेने गाझापट्टीवर कब्जा करणे आंतरराष्ट्रीय कायद्याशी सुसंगत होईल असे वाटत नाही. युद्ध काळात दीड लाख लोक आधी देश सोडून गेले आहेत. बाकीचे परतण्याच्या मार्गावर असताना हे नवे कोलीत टाकल्यामुळे तेही अस्वस्थ होतील आणि त्यांचे पुनर्वसन होईपर्यंत त्यांनी कुठे जावयाचे? ट्रम्प यांच्या २०२० च्या पुनर्वसन प्रस्तावात रेल्वे, बोगदे, रस्ते यांचे जाळे तयार करण्याची योजना होती. पण आता ट्रम्प मात्र निर्वासितांना कायमचे बेदखल करू इच्छितात. ही विसंगती म्हणावी लागेल. जॉर्डन आणि इजिप्तमध्ये सुमारे १८ लाख गाझा निर्वासित सध्या राहतात. ट्रम्प यांच्या योजनेनुसार ते जर परत गेले नाहीत तर या दोन्ही देशांच्या अर्थव्यवस्थेवर मोठा ताण पडणार आहे. संयुक्त राष्ट्रसंघाच्या तीन चतुर्थांश राज्यांनी पॅलेस्टाइनला स्वतंत्र राज्य म्हणून मान्यता दिली आहे.

# स्वराज्यरक्षक - छत्रपती शिवबा

शिवाजी शहाजी भोसले छत्रपती शिवाजी महाराज म्हणून प्रसिद्ध, हे एक भारतीय राजे आणि मराठा साम्राज्याचे संस्थापक होते. छत्रपती शिवाजी महाराजांचे जीवन म्हणजे एक दैवी चमत्कार होता. त्यांची आई जिजाबाई ही लखुजी जाधवराव या निजामशाहीतील शुरसरदाराची मुलगी तर वडील शहाजीराजे भोसले हे स्वकर्तृत्वाने सामर्थ्यवान असलेल्या मालोजीराव भोसले यांचे चिरंजीव. राजकारणात मुरलेल्या व आनंदाचा उन्मेश बाळगणाऱ्या माता-पित्यांच्या पोटी छत्रपती शिवाजी महाराजांचा जन्म १९ फेब्रुवारी १६३० यावर्षी वैशाख शुध्द द्वितीय पुणे जिल्ह्यातील जुन्नर शहराजवळील शिवनेरी या डोंगरी किल्यावर झाला. त्यामुळे शिवाजी महाराज हे महाराष्ट्रातल्याच नाहीतर अखिल भारतातल्या प्रत्येकाचे स्फुर्तीदायी दैवत आहे. इतिहासाच्या अभ्यासकांमध्ये छत्रपती शिवाजी महाराजांची नेमकी जन्मतारीख हा मतभेदांचा मुद्दा आहे. महाराष्ट्र राज्य शासनाने फाल्गुन वद्य तृतीया शके १५५१ (शुक्रवार, १९ फेब्रुवारी १६३०) ही शिवरायांची जन्मतारीख २००१ साली स्वीकारली. तेव्हापासुन महाराष्ट्र शासनाने शिवाजी महाराजांच्या जन्माच्या (शिवाजी जयंती) स्मरणार्थ १९ फेब्रुवारी हा दिवस सुट्टी म्हणून सूचीबद्ध केली आहे. इतर संभाव्य तारखांमध्ये ६ एप्रिल १६२७ (वैशाख शुद्ध तृतीया) ही एक जन्मतारीख मानली जात होती.

शिवाजी महाराजांचे नाव 'शिवाई' या देवतेवरून ठेवण्यात आले. एका आख्यायिकेनुसार शिवनेरी गडावरील शिवाई देवीला जिजाबाईंनी आपल्याला बलवान पुत्र व्हावा अशी प्रार्थना केली होती म्हणून या मुलाचे नाव 'शिवाजी' ठेवले गेले. शिवरायांचे वडील शहाजीराजे भोंसले हे मराठा सेनापती होते, ज्यांनी दख्खनच्या सल्तनतची सेवा केली होती. त्यांच्या आई जिजाबाई होत्या, ज्या सिंदखेडच्या लखुजी जाधवरावांच्या कन्या होत्या. जाधव हे देवगिरीच्या यादव राजघराण्यातील वंशाचे होते. छ.शिवाजी महाराज हे मराठा जातीतील आणि भोसले कुळातील होते. त्यांचे आजोबा मालोजी अहमदनगर सल्तनतचे एक प्रभावशाली सेनापती होते आणि त्यांना 'राजा' ही उपाधी देण्यात आली होती. लष्करी खर्चासाठी त्यांना पुणे, सुपे, चाकण आणि इंदापूरचे देशमुखी हक्क देण्यात आले होते. त्यांना त्यांच्या कुटुंबाच्या वास्तव्यासाठी किल्ला शिवनेरी देखील देण्यात आला होता.

जनमानसात शिवकार्यासंबंधी जी काही स्थुल कल्पना असते, त्यापेक्षा महात्मा फुल्यांची कल्पना फार वेगळी होती अर्थात एक लोकोत्तर शुरवीर पुरुष, जन्मजात जननेता, स्वराज्य संस्थापक, लोककल्याणाची सदैव काळजी वाहणारा राज्यकर्ता या विविध नात्यांनी शिवाजीची व शिवकार्याची जी महती आहे, ती फुल्यांना नि:संशय मान्य होती. परंतू शिवाजी हा हिंदूधर्मरक्षक होता, त्याचे राज्य हे हिंदू धर्मराज्य होते. तो गोब्राम्हण प्रतिपालक, क्षत्रीय कुलावतंस छत्रपती होता. अशी शिवकार्याची महती काहीजणांकडुन सतत आणि पध्दतशीर पणे मांडण्यात येते ती महात्मा फुल्यांना अजिबात मान्य नव्हती आणि त्यांना त्याबद्दल कौतुकही नव्हते.

शिवाजीला लढाईचे आणि राज्यकारभाराचे शिक्षण दादोजी कोंडदेव यांनी दिले. दहा-बारा वर्षाचे असतानाच शिवाजींच्या मनात स्वातंत्र्याचे वारे खेळू लागले. माझा देश मोगलांच्या आणि मुसलमानांच्या गुलामीतून मुक्त करायचा, माझ्या बांधवांना गुलामीतून आणि छळातून सोडवायचे. शिवाजींनी सफद्रीच्या कडेकपारीत भटकून सवंगडी गोळा केले. तानाजी, नेताजी, सुर्याजी, बाजी, वेसाजी असे एका पेक्षा एक जिवाला जीव देणारे मित्र गोळा केले. श्री रोहिडेश्वराच्या साक्षीने स्वराज्याची शपथ घेतली आणि एका स्वरात घोषणा दिली. 'हर हर महादेव' महाराष्ट्रातल्या मावळखोऱ्या पासुन त्यांनी आपल्या लढयाला आरंभ केला. साम-दंड-भेदांचा उपयोग करत अवघ्या चौदाव्या वर्षी शिवाजींनी 'तोरणागड' जिंकून स्वराज्याचे तोरण बांधले. मग त्यांनी मागे वळुन पाहिलेच नाही एका मागून एक गड आणि किल्ले जिंकून घेतले. पण त्यांनी पुणे ही नेहमीच आपली जहागिरी ठेवली आणि स्वतःची एक लहानशी फौज पदरी बाळगली. युध्दात शक्तीपेक्षा युक्तीच्या वापर जाथुष केला. राक्षसी देहाचा अफजलखान भेटीचे ढोंग करुन शिवाजींचा घात करायला आला होता.

त्यांनी पारतंत्र्यातून स्वातंत्र्याकडे जाण्यासही प्रेरणा मिळावी असे आपले चरित्र घडविले आणि एक मोठा आदर्श निर्माण केला कोणत्याही कार्याचा आरंभ लहानशा मर्यादेत होतो आणि पुढे ते कार्य मोठया मर्यादेत गेलेले आढळते. पवित्रगंगेचा उगम आणि पुढे तिचा झालेला विस्तार हे उदाहरण या दृष्टिने लक्षात घेण्या सारखे नाही कां? तर शिवाजी महाराजांचे कार्य जरी आरंभी महाराष्ट्राच्या विविध विषयाचा विरोध प्रकट करुन स्वराज्य स्थापनेच्या प्रयत्नापुरता मर्यादित असला तरी लोकांच्या मनात जी स्वातंत्र्य प्रेमाची ज्योत



पेटली त्यामुळे पुढे भारतात दक्षिणोत्तर ती प्रेरणा निर्माण झाली.

१३ व्या शतकांत देवगीरीच्या यादवांची सत्ता संपविणाऱ्या परधर्मी काही सत्ताधिशांनी महाराष्ट्रावर पुढे दोन-तीनशे वर्षे सत्ता गाजविली. जसजशी त्यांची सत्ता मजबूत होत गेली, तसतशी त्यांच्यातली जुल्मी प्रवृत्ती वाढीला लागली. आपल्या प्रजेवर अन्यायाने कर लादणे, त्यांची घरे दारे आणि जमिनी बळकाविणे, स्त्रियांची अब्रू लुटणे आणि गुलाम म्हणून प्रजेला राबवणे असे प्रकार सुरु झाले. सारी मराठी माणसे मनातून या जुलूमी सत्तेवर रागावली होती, पण म्हणतात ना सत्ते पुढे शहाणपण चालत नाही - तशी अवस्था होती. औरंगजेब हा जबरदस्त लष्करी सामर्थ्याचा, पराक्रमी, कट्टर मुसलमानपंथीय व दक्षिणेतील राजकारणाची माहिती असलेला बादशाह होता. पण शिवाजीने अफझलखान सारख्या पराक्रमी मुसलमान सरदारास यमसदनी पाठविल्यानंतर नंतर तो जिवंत असे पर्यंत महाराष्ट्रात येण्याची त्याची छाती झाली नाही. औरंगजेबाने शिवरायांना पकडून आग्रा येथे ठेवले, पण तेथूनही ते शिताफीने निसटले, तेव्हा औरंगजेबाने त्यांचा धसकाच घेतला.

स्वदेश स्वतंत्र व्हावा ही माता-पित्यांची इच्छा शिवाजीने पूर्ण केली. हिंदु धर्माचा पाडाव करुन सर्व हिंदुस्थान मुसलमानमय करुन टाकावाया महत्वाकांक्षेने झपाटलेला औरंगजेब हा दिल्लीच्या तख्तावर होता. शिवाजी महाराजांच्या जन्माच्या वेळी दख्खनमधील राजसत्ता विजापूर, अहमदनगर आणि गोवळकोंडा या तीन इस्लामी सल्तनतींमध्ये विभागलेली होती. विजापूरची आदिलशाही, अहमदनगरची निजामशाही, गोवलकोंडयाची कुतुबशाही अशा वेढयात सापडलेला पूणे-सुपे परिसर या तिन्ही मुस्लिम राज्यांवर औरंगजेबाची हुकूमत होती. तो दिल्लीहून सतत त्यांना सैन्य व पैसा पुरावत होता. माता जिजाऊंनी शिवाजीराजांच्या मनात या अन्यायकारी वृत्ती विषयाचा विरोध आणि बीज निर्माण करुन स्वांतत्र्य आणि स्वराज्य या विषयींच्या निष्ठा निर्माण केल्या. शिवाजीराजांच्या अंगभूत गुणांचा विकास केला आणि हळूहळू शिवाजीराजे त्या दिशेने प्रयत्न करु लागले. मराठी माणसांच्या मनातल्या रागाला नेमकी दिशा दाखविण्यासाठी त्यांनी 'मराठा तितुका मेळवावा' हे सुत्र धरुन स्वातंत्र्यप्रेमी, पराक्रमी आणि निष्ठावान माणसांना एकत्र केले. यावेळी त्यांच्या लक्षात आले की, काही स्वार्थी मराठी माणसे सरदारकी, जहागिरी आणि मोठया हुद्यासाठी परक्या सत्ताधिशांच्या चाकरीत धन्यता मानून शिवाजीराजांच्या स्वातंत्र्य लढयाला विरोध करत होते.

रायगडावर भेट ठरली, मिठी मारण्याचे सोंग करुन त्यांने शिवाजीवर तलवार चालवली. पण शिवाजी सावध होताच हातात लपविलेल्या वाघ नखांनी अफजलखानाचा कोथळाच बाहेर काढला. पळून गेला म्हणून शाहिस्ते खान भेटला, शिवाजी महाराज स्वराज्य निर्माण करतांना येणाऱ्या प्रत्येक संकटाला जोमाने सामोरे गेलेच पण त्यांचे संवगडीही त्यांना समर्थ साथ देत होते. सिंहगड सर करतांना तानाजी पडला. खिंड लढवितांना बाजीप्रभुने छातीचा कोट केला. महाडकर, प्रतापराव गुर्जर अशा एकाहुन एक शुर संवगड यांनी आपलं मत दिले. आपले प्राण दिले. तेव्हा स्वराज्य आकाराला आले. स्वराज्यात आता ८५ किल्ले आणि दोनशे चाळीस गड आहेत.

लोकांनी शिवाजी महाराजांना राज्यभिषेक करवून घेण्याचा आग्रह केला. महाराजांनी आपल्या मातेशी आणि जवळच्या सरदारांशी चर्चा करुन राज्यभिषेक करवून घ्यायचा असे ठरवले. काशीचे प्रसिध्द पंडीत गागाभट्ट धार्मिक विधी करण्यासाठी आले. स्वराज्याची राजधानी रायगड ठरली. शिवाजी राजा सिंहासनावर बसला. लोकांनी जयजयकार केला, छत्रपती श्री शिवाजी महाराज की जय' शिवाजी महाराजांनी आपले जीवन देव, देश आणि धर्म यासाठी वेचले. संत तुकाराम हे त्यांचे आध्यात्मिक गुरु होते तर संतरामदास हे त्यांचे राजकीय गुरु होते. शिवाजी महाराजांचा राज्यभिषेक ६ जून १६७४ साली रायगडावर झाला. त्यानंतर थोडयाच काळात म्हणजे ६ वर्षानंतर ३ एप्रिल १६८० मध्ये शिवाजी महाराजांचे रायगडावर निधन झाले. रामदासांनी त्यांचे गुणगौरव करतांना म्हटले,

निश्चयाच्या महामेरु । बहुत जणासी आधारु ।।
अखंड स्थितीच्या निर्धारु । श्रीमंत योगी ।।

इतिहासाच्या पानावररयतेच्या मनावरमातीच्या कणावर- आणि विश्वासाच्या प्रमाणावर राज्य करणारा राजा म्हणजे, राजा शिवछत्रपतींच्या ३९६ व्या जयंती दिना निमित्त मानाचा मुजरा.

---------

प्रविण बागडे नागपूर
भ्रमणध्वनी : ९९२३६२०९१९
ई-मेल : ीीळिंपलरसवशसारळश्र.लो

# आदर्शवत-राजे, छत्रपती शिवराय!

भारत देशाला एक समृद्ध ऐतिहासिक पार्श्वभूमी आहे. जिथे इतिहासाने थोर संत,महात्मे,महापुरुष, राजे-महाराजे अशा महान भारतीय नेत्यांसह अनेक महत्वपूर्ण घटना पाहिल्या आहेत.आणि नोंदवून ठेवल्या आहेत.तसेच भारताच्या इतिहासात अशा कितीतरी महान प्रसिद्ध घटना घडल्या आहेत व इतिहास त्याला साक्ष आहे. त्यातीलच एक घटना राजेशाही शिवाजी महाराजांचे महान शौर्य दाखवते. त्यांचा दृढनिश्चय,प्रबळ इच्छाशक्ती,वर्चस्व, धैर्य व शौर्य. आपल्या राजमार्गात कोणत्याही बंधनाला थारा न देणारे एक धाडसी शासक, तसेच लोकांसाठी,लोकांच्या कल्याणासाठी अन्याय अत्याचाराविरुध्द लढणारा राजा म्हणून त्यांची इतिहासात ओळख आहे.

मुघल व ब्रिटिश साम्राज्यात जुलमी शासकाविरुध्द लढा देऊन स्वबळावर एक प्रतिष्ठित राजेशाही साम्राज्य निर्माण केले.म्हणुन राजेशाही भारताच्या इतिहासात शिवाजी महाराजांना विरयोध्दा सुध्दा मानले जाते. महाराष्ट्राच्या सामाजिक आणि राजकीय इतिहासामध्ये त्यांचा मोठा प्रभाव होता व आहे.म्हणुन इतिहासात त्यांना मानाचे स्थान आहे.

अनेक भारतीय स्वातंत्र्य सैनिकांनी त्यांना राष्ट्रहित,प्रजाहित जपणारे राजा मानले आहे.आणि म्हणूनच मराठी लोकांच्या अस्मितेचा ते एक अविभाज्य भाग बनले आहेत.त्यांच्या कार्याची,त्यांनी घडवलेल्या इतिहासाची माहिती आम्हाला असली पाहिजे.त्यांचा इतिहास आम्ही वाचला पाहिजे.त्यांचा आदर्श आम्ही आमच्या डोळ्यासमोर ठेवला पाहिजे.

शिवाजी महाराजांचा इतिहास प्रेरणादायी व वैभवशाली आहे.खुप मोठ्या प्रयासाने लोकाभिमुख रयतेचे राज्य निर्माण केले.या आपल्या कारकिर्दीत मुघल साम्राज्य, गोवळकोंड्याची कुतुबशाही,विजापुरची आदीलशाही, निजामशाही तसेच युरोपियन वसाहती शक्तींशी परिस्थिती नुसार कधी युती केली तर कधी युद्ध व शत्रुत्व पत्करले. त्यांची लढाई राजकीय,व अन्यायाच्या विरुद्ध होती. ती धार्मिक नव्हती.

त्यांच्या सैन्यात शिस्तबद्ध लष्कर, सुसज्ञ प्रशासकीय यंत्रणा या गोष्टीला फार महत्त्व होते.शिस्तबध्द प्रशासकीय यंत्रणेसोबत सक्षम आणि प्रगतीशील नागरी शासनप्रणाली पण होती. त्यामुळे आजुबाजूच्या प्रदेशातील इंत्यभुत माहिती,आश्चर्यकारक वेगवान हालचाली आणि गमीनी काव्याचे तंत्र यांच्या साहाय्याने आपल्या थोडे फौजेच्या मदतीने बलाढ्य फौजांचा सामना करण्याचे धाडस केले. आणि त्यात ते सफल झाले.

राज्य कारभार कसा करावा,त्यात सुसुत्रपणा कसा असावा,काम करण्याची पध्दत कशी असावी,प्रजेचे रक्षण कसे करावे.शेतकऱ्याचे हित कसे जपावे त्यांच्या एकनिष्ठ कार्यातून,आचारविचारांतून दिसून येते.

शेतकरी सुखी, रयत सुखी तर राजा सुखी.शेतकऱ्यांना त्रास होईल असे वागू नका,विना मोबदला कोणाचेही काही घेऊ नका. शेतकऱ्याच्या गवताच्या काडीला आणि भाजीच्या देठालाही हात लावू नका. अशा प्रकारच्या सुचना त्यांनी केल्या.शेतकऱ्याचे हित ते राज्याचे हित आपल्या राज्यातील गरीब शेतमजुर,शेतकरी हा सुखी राहिला पाहिजे.तो उपाशी झोपता कामा नये.प्रसंगी तिजोरीवर बोजा पडला तरी चालेल.शेतकऱ्याच्या मालाला भाव मिळाला पाहिजे यासाठी ते दक्ष राहत. टंचाईच्या काळात शेतकऱ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहत.त्यांनी शेतकऱ्याच्या हिताला नेहमीच प्राधान्य दिले.हे शिवाजी महाराजांचे धोरण होते.महाराजांचे हे शेतकरी हिताचे धोरण आताच्या राज्यकर्त्यासमोर एक आदर्श आहे.

पण आमच्या राज्यकर्त्यांनी तर स्वमिनाथन आयोग कितीतरी वर्षापासून फाईल मध्येच रखडून ठेवलेला आहे.तो लागू तर केलाच नाही,पण शेतकरी विरोधी कायदे मात्र होत आहेत.कुठे कुठे शेतकऱ्याच्या शेतात जायला रस्ते नाहीत.मालाला पाहिजे तसा भाव नाही. बि बियाण्यांचे भाव दिवसेंदिवस वाढतच चालले आहेत.दिवसा शेतातील पिकाला पाणी देण्यासाठी विद्युत राहत नाही.रात्रीला राहते त्यामुळे शेतकरी व शेतमजुराला अंधारात जीव धोक्यात घालून पिकाला पाणी द्यायला शेतात जावे लागते. अशी परिस्थिती आहे.मग शेतकऱ्यांचे हित पाहणारे राज्यकर्ते आहेत का?

शिवाजी महाराजांचा हा राज्य कारभार करण्याचा आदर्श आजच्या राज्य कारभार करणाऱ्या लोकांनी घेतला असता तर देश केव्हाचा विकसित झाला असता. विकसित भारताचे स्वप्न पाहायची गरज पडली नसती.पण दुर्दैव राज्यकर्त्यांनी तो आदर्श घेतला नाही.पर्यायाने देशाची परिस्थिती आज आमच्या समोर आहे.

शिवाजी महाराज आजरोजी हयात असते,आणि त्यांनी इथल्या राज्यकर्त्यांचा कारभार पाहिला असता,तर त्यांनी सर्वात पहिले इथल्या राज्यकर्त्यांना जेलमध्ये टाकले असते.

कारण इथल्या राज्य कर्त्यांनी फक्त कोरड्या वल्गनाच केल्या. देश असा घडवू, महाराष्ट्र सुजलाम घडवू,सुफलाम घडवू,सुंदर घडवू,उत्तमोत्तम घडवू प्रत्यक्षात कृती मात्र शुन्य!

शिवाजी महाराजांनी राज्य कारभार करतांना जातपात पाहिली नाही.किंवा धर्माचा द्वेष अथवा तिरस्कार केला नाही.भेदाभेद,भेदभाव केला नाही.सर्वच जाती धर्माचे लोक त्यांच्या सैन्यात होते.मुसलमान शिपाई सुध्दा होते.काझी हैदर त्यांचा वकिल होता.सिध्दी इब्राहिम त्यांचा अंगरक्षक होता.दौलतखान तोफखान्याचा प्रमुख होता.तर नुरखाबेग घोडदलाचा प्रमुख निष्ठावान सेनापती होता.त्यांचा लढाच अन्याय अत्याचाराविरुध्द होता.त्यांच्या राज्यात श्रीमंत असो की गरीब सर्वांना समान न्याय मिळत होता.

रांझाच्या एका पाटलाने एका महिलेवर अत्याचार केला होता तर शिवाजी महाराजांनी त्याचे हात आणि पाय छाटले होते.त्यांच्या राज्यात महीलांवर अत्याचार करणाऱ्या गुन्हेगाराची गय नव्हती.तो मग कोणीही असो. त्यामुळे गुन्हा करण्याची कोणाची हिम्मत होत नव्हती.

कोण किती प्रमाणात वाईट व चांगला आहे.हा माणसे ओळखण्याचा दृष्टीकोन त्यांच्याकडे होता.अन्याय करणारा आणि अन्याय करणाराला साथ देणाऱ्यांची त्यांना फार चीड होती.म्हणून त्यांनी अफजलखान व कृष्णाजी भास्कर कुलकर्णी यांचा वध केला.

मुस्लीम समाजाच्या महिलेला सैनिकांनी पकडून शिवाजी महाराजांच्या समोर आणले तेव्हा त्यांनी त्या महिलेला आपल्या मातेसमान दर्जा दिला.आणि सुखरुप सोडून देण्याचा सैनिकांना आदेश दिला.परस्त्रीला मातेचा दर्जा देणारा असा नीतिमान लोकराजा.

अशा या महापुरुषांचा छत्रपती शिवाजी महाराजांचा जन्म शहाजीराजे भोसले आणि जिजाऊ यांच्या उदरी पुणे येथील जुन्नर तालुक्यातील शिवनेरी किल्यावर १९ फेब्रुवारी १६३० मध्ये झाला.

लहानपणापासूनच राजमाता जिजाऊने अन्यायाविरुद्ध लढण्यासोबत गोरगरिबांची सेवा व न्याय हक्कासाठी लढण्याचे शिक्षण दिले. आपल्या थोर माता जिजाऊंच्या सुसंस्कृत शिकवणुकीतून शिवराय घडले.

माता जिजाऊंच्या शिकवणुकीचा परिणाम म्हणजे वयाच्या १६ व्या वर्षी आपल्या अठरा पगड जातीच्या सवंगड्यासोबत रायरेश्वराच्या मंदीरात शिवबांनी स्वराज्य घडवण्याची ते निर्माण करण्याची शपथ घेतली. आणि ते स्वराज्य निर्माण करण्यासाठी आयुष्यभर झटले.

१९४६ मध्ये वयाच्या अवघ्या १६व्या वर्षी आदिलशहाच्या ताब्यात असलेला तोरणा हा पहिला किल्ला जिंकून स्वराज्याचे तोरण बांधले. हा किल्ला अतिशय अवघड व प्रचंड मोठा होता.महाराजांनी याचे नाव बदलून प्रचंडगड ठेवले.या गडावर महारांजांनी काही इमारती बांधल्या.याच गडावर प्रचंड खजिना सापडला.त्या खजिन्याचा वापर स्वराज्याची पहिली राजधानी राजगड बांधण्यासाठी केला. ज्याच्या कडे जास्त किल्ले त्याचे प्रभुत्व असायचे.म्हणुन एकामागून एक असे ३०० च्या वर किल्ले महाराजांनी जिंकले. त्यातील १३ सागरी किल्ले होते. काही किल्ले त्यांनी स्वतःबांधले.

कोंढाणा किल्ला जिंकण्यासाठी तानाजी मालुसरे यांचा इतिहास आम्ही वाचलेलाच आहे.आधी लगन कोंढाण्याचे मग रायबाचे अशी जीवाला जीव देणारी माणसे महाराजांकडे होती.अशी कितीतरी लोक महाराजांकडे होती. नीतीवान राजांची निष्ठावान माणसे होती ती!

जेवढे थोर पुरुष, महापुरुष, घडले त्यांच्या घडण्याच्या मागे स्त्रियांचा हात आहे. तसाच शिवबाला घडवण्याच्या मागे माता जिजाऊंचा खूप मोठा हात होता.

आजच्या महिलांनी तर माता जिजाऊंचा शिवबाला घडवण्याचा हा आदर्श घेण्याची नितांत गरज आहे.माता जिजाऊंनी शिवरायांवर केलेले संस्कार आणि त्या संस्कारातून घडलेले शिवबा हा आदर्श आमच्यासाठी आदर्शवत आहे.

पण अशा थोर राजाचा राज्यभिषेक करण्यासाठी त्यांना शुद्र संबोधणे आणि राज्यभिषेक करायला नकार देणे कितपत योग्य होते. की त्यांचा राज्यभिषेक करण्यासाठी काशीवरुन गागाभटाला बोलवावे लागले.येथे आल्यावर गागाभटाने सुध्दा राज्यभिषेक करायला नकार दिला होता.मेवाडच्या राजपूत घराण्याशी त्यांची वंशावळ जुळते हे सिध्द करावे लागले.तेव्हा कुठे त्यांचा राज्यभिषेक झाला. खूप मोठा खर्च त्यांना राज्यभिषेक करण्यासाठी करावा लागला.

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी शुद्र पुर्वी कोण होते या पुस्तकात शिवाजी महाराजांच्या राज्यभिषेकाला कसा विरोध झाला. कशी पुरावे सादर करावे लागले.कशी मेवाडचे राज्यकर्ते सिसोदिया राजपूत यांच्या वंशजापासून शिवाजीराजांचे वंशज जन्मले म्हणून ते क्षत्रिय ठरतात अशी वंशावळ बाळाजीने जुळवून गागाभट्टाला दिली. त्यावेळी कुठे गागाभट्ट राज्यभिषेक करायला तयार झाला. किती खर्च करावा लागला. असे बरेचसे लिखाण शिवाजी महाराजांवर त्यांच्या राज्यभिषेकाविषयी केलेले आहे. बरेचसे दाखले, पुरावे दिलेले आहेत. डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी लिहिलेले शुद्र पुर्वी कोण होते हे पुस्तक एखादा आवश्य वाचा.

आजच्या महिलांनी राजमाता जिजाऊ वाचल्या पाहिजे.त्यांचा शिवबावर केलेल्या संस्काराचा आदर्श घेऊन मुलांना तसे घडवण्याचा प्रयत्न केला पाहिजे. शिवाजी महाराजांचे विचार मुलांना सांगितले पाहिजे.तरुणांनी सुध्दा शिवाजी महाराजांचा आदर्श घेऊन त्यांचे विचार अंगीकारले पाहिजे तीच खऱ्या अर्थाने चांगल्या परिवर्तनाची नांदी ठरेल. आणि तिच शिवाजी महाराजांना खऱ्या अर्थाने त्यांच्या जयंतीदिनी अभिवादन ठरेल.

विनोद सरदार
फुले आंबेडकर विद्वत सभा
मो.नं.९६८९८४७११५

# स्वराज्याच्या आरमाराची गोष्ट; सागरी तटबंदी भक्कम असणं शिवरायांना का महत्त्वाचं वाटलं होतं?



उहहरींररींळ ड्हर्ळींरक्षळ चरहरीरक्ष गरूरपींळ २०२५: कोकण प्रांताला निसर्गाने भरभरुन सौंदर्य आणि साधनसंपत्ती दिली आहे वेळ पडलीच तर शांत असणारा हा समुद्र रौद्ररुपही धारण करेल हे छत्रपती शिवरायांनी ओळखलं होतं. जो अथांग समुद्र उपजिवीकेचं साधन आहे तोच समुद्र परकीय आक्रमणांपासून आपलं रक्षणही करु शकतो ही बाब लक्षात घेत महाराजांनी स्वराज्यातील रयतेच्या हितासाठी आरमाराची उभारणी केली.

ज्याचं समुद्रावर राज्य त्याची सत्ता, ज्याचं आरमार भक्कम त्याचं वर्चस्व. भविष्यात युद्ध हे जमिनीप्रमाणे पाण्यातही होऊ शकतं, ही दूरदृष्टी महाराजांची होती. व्यापारासाठी आलेले मुघल, पोर्तुगीज, ब्रिटीश यांनी सागरी मार्गाने येत मराठ्यांच्या भूमीत अमानुषपणे सत्ता प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केला. म्हणूनच जर परकिय आक्रमणांशी दोन हात करायचे असतील तर मराठ्यांची समुद्रावर सत्ता असणं महत्त्वाचं होतं. म्हणूनच महाराजांनी कोकणप्रांतात जलदुर्गांची उभारणी केली. याच कारणामुळे छत्रपती शिवरायांना द फादर ऑफ इंडियन नेव्ही म्हणजेच भारतीय नौदलाचे जनक देखील म्हटले जाते.

मुंबईचे ब्रिटीश, वसईचे पोर्तुगीज, जंजिऱ्याचा सिद्धी यांच्या कारनाम्यांवर वचक बसावा म्हणून राजांनी कोकण प्रातांत मराठ्यांच्या चौकी उभारल्या. शिवरायांच्या काळात कल्याण भिवंडी हे व्यापाऱ्याचं केंद्र होतं. खाडी असल्या कारणाने येथून पुणे, मुंबई आणि पालघर , अलिबाग या परिसारात मालाची आयात निर्यात होत असे. ही बाब लक्षात घेत राजांनी स्वराज्याच्या आरमाराची मुहुर्तमेढ कल्याण येथे रोवली. भिवंडीत किल्ले दुर्गाडी ही मराठ्यांची चौकी उभारली. या ठिकाणाहून येणाऱ्या जाणाऱ्या जहाजांनी पाहणी आणि मराठ्यांच्या परवानगी शिवाय कोणताही व्यापार होत नसे. यामुळे ब्रिटीश, डच आणि मुघल सैन्यावर मराठ्यांची दहशत बसली होती. जिथे समुद्र तिथे आमची सत्ता असं म्हणत कोकण प्रांतात पोर्तुगीजांची सत्ता वाढत चाचली होती. वसई ते गोव्यापर्यंत पोर्तुगीजांनी सत्ता बळकट होत होती म्हणूनच राजांनी मालवणच्या कुरटे बेटावर जलदुर्ग उभारणीचे आदेश हिरोजी इंदुलकरांना दिले. कुरटे बेटावर बांधलेला किल्ला म्हणजे किल्ले सिंधुदुर्ग होय. परकीय व्यापारांवर नजर रहावी म्हणून राजांनी मालवणच्या बेटाला आरमाराचे केंद्र बनविले. याचप्रमाणे किल्ले खांदेरी उंदेरी आणि किल्ले कुलाबा हे देखील आरमारातील मुख्य जलदुर्ग आहेत.

याचं कारण म्हणजे मुंबईचे ब्रिटीश आणि जंजिऱ्याचा सिद्धी यांचे राजकीय संबंध सलोख्याचे होते. राजांनी अनेक प्रयत्न केले मात्र शेवटपर्यंत जंजिरा मराठ्यांच्या हाती येत नव्हता. म्हणूनच ब्रिटीश आणि सिद्धी एकत्र येत स्वराज्यास कोणताही दगाफटका करु नये म्हणून राजांनी या जलदुर्गांची उभारणी केली. राजांच्या या धोरणांना निष्ठावंत मावळ्यांनी देखील तितकीच साथ दिली होती. मराठ्यांची समुद्रावर सत्ता भक्कम करण्यात सरखेल कान्होजी आंग्रे यांचा मोलाचा वाटा होता.

सागरी मार्गाने परकीय सत्ता आपल्यावर कधीही आणि कुठल्याही प्रकारे हल्ला करण्याचा प्रयत्न करणार हे भविष्य महाराजांनी साडे तीनशे वर्षांपुर्वीच ओळखलं होतं. २६ नोव्हेंबर २००८ मध्ये मुंबईवर हल्ला करण्यासाठी आलेले दहशतवादी हे सागरी मार्गाने आले होते. यावरुन सागरी तटबंदी भक्कम असणं किती महत्त्वाचं आहे ही महाराजांची दूरदृष्टी आजही लागू पडते. इतिहासात अनेक राजे होऊन गेले. मात्र छत्रपती शिवाजी राजांचं धोरण राजांची दूरदृष्टी, धर्माप्रति असलेली निष्ठा, त्यांचं शौर्य आणि रायतेवर असलेलं आभाळाभर प्रेम यामुळे शिवरायांचा इतिहास आजही प्रत्येकाला प्रेरणा देणारा आहे.

## शिवजयंतीला घरी बनवा मराठमोळी परंपरा असलेली चविष्ट सांज्याची पोळी, पदार्थ होईल एकदम मस्त

दरवर्षी सगळीकडे १९ फेब्रुवारीला शिवजयंती साजरी केली जाते. अनेक ठिकाणी छत्रपती शिवाजी महाराज यांचे बॅनरसुद्धा लावण्यात आले आहेत. तर अनेक ठिकाणी आणि सरकारी कार्यलयांमध्ये मोठ्या आनांदात आणि उत्साहात शिवजयंती साजरा केली जाते. यादिवशी महाराजांविषयी मनात प्रेम आणि आपुलकी वाढवण्यासाठी त्यांची मोठ्या श्रद्धेने पूजा करून वेगवेगळ्या पदार्थांचा नैवेद्य बनवून दाखवला जातो. तसेच यादिवशी मराठी परंपरेनुसार घरी काहींना काही गोड पदार्थ बनवला जातो. त्यामुळे आज आम्ही तुम्हाला सोप्या पद्धतीमध्ये सांज्याची पोळी बनवण्याची सोपी रेसिपी सांगणार आहोत. सांज्याची पोळी बनवण्यासाठी फार कमी साहित्य लागते. सांज्याच्या पोळ्या चवीला अतिशय सुंदर आणि पौष्टिक असतात. हा पदार्थ अधिक काळ चांगला टिकून राहतो. त्यामुळे बाहेर फिरायला जाताना किंवा इतर वेळी घरी खाण्यासाठी तुम्ही सांज्याच्या पोळ्या बनवू शकता. चला तर जाणून घेऊया सांज्याच्या पोळ्या बनवण्याची सोपी रेसिपी. साहित्य: गूळ गव्हाचं पीठ रवा मीठ तूप वेलची पावडर जायफळ पावडर १० मिनिटांमध्ये नाश्त्यासाठी बनवा हेल्दी टेस्टी स्ट्रॉबेरी बनाना स्मूदी, पोट राहील दीर्घकाळ भरलेले कृती: सांज्याची पोळ्या बनवण्यासाठी सर्वप्रथम, ताटात गव्हाचं पीठ घेऊन त्यात चवीनुसार मीठ टाकून मिक्स करून घ्या. नंतर त्यात पाणी घालून कणिक मळून त्याला तेल लावून ठेवा. कढईमध्ये पाणी गरम करून त्यात चवीनुसार गूळ टाकून वितळालवून घ्या. नंतर त्यात चमचाभर वेलची पावडर आणि जायफळ पावडर टाकून मिक्स करून घ्या. पाण्याला उकळी आल्यानंतर त्यात रवा टाकून मिक्स करा. तयार केलेले मिश्रण थंड झाल्यानंतर त्याचे गोळे करून घ्या. रव्याचे तयार करून घेतलेले सारण गव्हाच्या पिठामध्ये भरून त्याची पोळी लाटून घ्या. दोन्ही बाजूने पोळी लाटून त्यावर तूप लावा. तयार आहे सोप्या पद्धतीमध्ये बनवलेली सांज्याची पोळी.



# पोटातील गॅस कमी करण्यासाठी सकाळी उपाशी पोटी करा ‘या’ हिरव्या पदार्थाचे सेवन, पोट होईल क्षणार्धात स्वच्छ

रोजच्या आहारात बदल झाल्यानंतर पचनसंस्था बिघडते. तेलकट तिखट पदार्थांचे अतिसेवन, जंक फूड खाणे, शरीरात निर्माण झालेली पाण्याची कमतरता इत्यादी अनेक गोष्टींचा परिणाम पचनक्रियेवर होण्याची शक्यता असते. त्यामुळे शरीर हायड्रेट ठेवण्यासाठी नियमित भरपूर पाणी पिणे आवश्यक आहे. पचनक्रिया बिघडल्यानंतर पोटात गॅस होणे, अपचन झाल्यासारखे वाटणे, गॅस होणे, पोट फुगणे इत्यादी अनेक समस्या उद्भवू लागतात. या सर्व समस्यांवर रामबाण उपाय म्हणजे वेलदोडे. वेलदोड्याचे सेवन केल्यामुळे आरोग्याला अनेक फायदे होतात. पचनक्रिया बिघडल्यानंतर वेलदोड्याच्या पाण्याचे सेवन करावे. हे पाणी शरीरासाठी प्रभावी आहे.(फोटो सौजन्य - ळडींलज्ञ)





वेलदोड्यांमध्ये अनेक औषधी गुणधर्म आढळून येतात. याशिवाय यामध्ये अँटीऑक्सिडंट्स, फायबर्स, मॅग्नेशियम, पोटॅशियम आणि अँटी-बॅक्टेरियल गुणधर्म मोठ्या प्रमाणात आढळून येतात. शरीरात साचून राहिलेले विषारी घटक आरोग्यासाठी हानिकारक आहेत. हे विषारी घटक बाहेर पडून न गेल्यामुळे पचनक्रिया बिघडते. त्यामुळे आज आम्ही तुम्हाला वेलदोड्याचे पाणी प्यायल्यामुळे आरोग्याला नेमके काय फायदे होतात, याबद्दल सविस्तर माहिती सांगणार आहोत.

पचनक्रिया सुधारते:

सकाळी उठल्यानंतर उपाशी पोटी वेलदोड्याचे पाणी प्यायल्यामुळे शरीरात साचून राहिलेले विषारी घटक बाहेर पडून जातात. ज्यामुळे पचनक्रिया सुधारते. अपचन, गॅस, ऍसिडिटी इत्यादी अनेक समस्यांपासून आराम मिळवण्यासाठी वेलदोड्याचे पाणी प्यावे. या पाण्याचे नियमित सेवन केल्यास पचनसंस्था निरोगी राहते आणि बद्धकोष्ठतेची समस्या उद्भवत नाही.

शरीरातील विषारी घटक बाहेर पडून जातात:

शरीरात साचून राहिलेली विषारी घटक आरोग्यासाठी अतिशय घातक आहे. यामुळे पचनसंस्था बिघडण्यासोबत आरोग्याला हानी पोहचते. त्यामुळे सकाळी उठल्यानंतर नियमित वेलदोड्याचे पाणी प्यावे. वेलदोड्याचे पाणी प्यायल्यामुळे यकृताचे कार्य सुधारते आणि शरीरातील रक्तशुद्ध होण्यास मदत होते. त्यामुळे नियमित तुम्ही वेलदोड्याच्या पाण्याचे सेवन करू शकता.


रक्तदाब नियंत्रणात राहतो:

शरीरात वाढलेला उच्च रक्तदाब शरीराला हानी पोहचवतो. वेलदोड्यांमध्ये पोटॅशियम आणि अँटीऑक्सिडंट्स घटक आढळून येतात, ज्यामुळे शरीराचा रक्तदाब नियंत्रणात राहतो. या पाण्याचे सेवन केल्यामुळे हृदयविकाराचा झटका येण्याची शक्यता कमी होते. वेलदोड्याचे पाणी प्यायल्यामुळे शरीरात वाढलेला कोलेस्ट्रॉल नियंत्रणात राहतो.

तणाव कमी होतो:


शारीरिक आणि मानसिक तणाव कमी करण्यासाठी अनेक प्रयत्न केले जातात. मात्र तरीसुद्धा तणाव कमी होत नाही. वाढलेला तणाव कमी करण्यासाठी नियमित वेलदोड्याचे पाणी प्यावे. या पाण्याच्या सेवनामुळे मानसिक तणाव कमी होतो. त्यामुळे झोपण्याआधी वेलदोड्याच्या पाण्याचे सेवन करावे.

# आंघोळ करताना चुकूनही करू नका ‘या’ चुका! फायदे होण्याऐवजी होईल आरोग्याचे नुकसान, वाढले हार्ट अटॅकचा धोका



दैनंदिन जीवन जगताना शरीर स्वच्छ ठेवण्यासाठी नियमित अंघोळ केली जाते. अंघोळ केल्यामुळे शरीरावरील घाण स्वच्छ होते. याशिवाय मनाला सुद्धा प्रसन्न वाटते. अंघोळ केल्यामुळे शारीरिक, मानसिक आरोग्यासोबत शरीराचे रक्तभिसरण सुधारते, त्वचेचे आरोग्य सुधारते इत्यादी अनेक फायदे होतात. शरीर स्वच्छ ठेवण्यासाठी नियमित अंघोळ केली जाते.पण चुकीच्या पद्धतीने अंघोळ केल्यामुळे शारीरिक आरोग्यासोबतच मानसिक आरोग्यसुद्धा बिघडण्याची शक्यता असते. अनेक लोक चुकीच्या पद्धतीने अंघोळ करतात, त्यामुळे शारीरिक आरोग्य बिघडते, जे त्वचा आणि शरीरासाठी अतिशय हानिकारक आहे. सर्वच ऋतूंमध्ये अनेकांना गरम पाण्याची अंघोळ करण्याची सवय असते. पण गरम पाण्याने अंघोळ केल्यास आरोग्यावर परिणाम होतात. जास्त गरम पाण्याने अंघोळ करणे, अंघोळीला एकच साबण वापरणे, ओले केस तसेच बांधून ठेवणे, जास्त जाड कपड्याने अंग पुसणे इत्यादी चुकीच्या सवयींमुळे आरोग्याला हानी पोहचण्याची शक्यता असते. चुकीच्या पद्धतीने अंघोळ केल्यास त्वचा जास्त प्रमाणात कोरडी पडणे, त्वचेवर सुरकुत्या येणे इत्यादी अनेक गंभीर समस्या उद्भवू शकतात. त्यामुळे आज आम्ही तुम्हाला अंघोळ करताना कोणत्या चुका करू नये, याबद्दल सविस्तर माहिती सांगणार आहोत. या चुका टाळल्यास आरोग्याला अनेक फायदे होतील. गरम पाण्याची अंघोळ करणे: गरम पाण्याची अंघोळ केल्यामुळे आरोग्याला धोका निर्माण होण्याची शक्यता असते. थंड पाण्याची अंघोळ केल्यानंतर शरीराला आराम मिळतो. पण नेहमी नेहमी गरम पाण्याची अंघोळ केल्यामुळे त्वचेमधील नैसर्गिक तेल कमी होऊन जाते आणि त्वचा अधिक कोरडी पडते. त्वचा कोरडी झाल्यानंतर त्वचेसंबंधित समस्या उद्भवण्याची शक्यता असते. त्यामुळे नेहमी नेहमी अंघोळीला गरम पाणी घेऊ नये. गरम पाण्याचा जास्त वापर केल्यामुळे त्वचेवर सुरकुत्या पडतात. चुकीच्या साबणाचा वापर करणे: अंघोळ करताना अनेक घरांमध्ये अजूनही एकाच साबणाचा वापर केला जातो. घरातील लहान मुलांपासून ते मोठ्यांपर्यंत सगळेच एकच साबण वापरतात. पण एकच साबण वापरल्यामुळे त्वचेचे नुकसान होते. साबणामध्ये असलेले हानिकारक रसायन त्वचा कोरडी करून टाकते, ज्यामुळे त्वचेवर लवकर सुरकुत्या येणे, त्वचेची गुणवत्ता खराब होणे इत्यादी अनेक समस्या उद्भवतात. अधिक वेळ केस ओली ठेवणे: अंघोळ करताना केस धुतल्यानंतर काहींना केसांना टॉवेल लावण्याची सवय असते. पण जास्त वेळ केसांवर टॉवेल लावून ठेवल्यामुळे केस खराब होतात. याशिवाय केसांमधील पाणी टाळूमध्ये मुरते आणि सर्दी होण्याची शक्यता असते. याशिवाय ओले केस योग्य वेळी स्वच्छ न केल्यामुळे केसांमध्ये कोंडा होणे, केस तुटणे इत्यादी अनेक समस्या उद्भवू शकतात.

# पित्त आणि पित्ताशयामध्ये नेमका फरक काय? एकच असण्याचा गैरसमज करा दूर



पित्त हा पिवळसर-हिरवा पाचक द्रव आहे. तर पित्ताशय हा यकृताखालील एक लहान अवयव आहे जो पित्त साठवतो आणि बाहेर सोडतो. पित्ताशयातील खडे, पोट फुगणे किंवा पाचन समस्या असल्यास सर्वात आधी या दोघांमधील फरक समजून घेणे गरजेचे आहे. डॉ. अपर्णा गोविल भास्कर, सल्लागार बॅरिएट्रिक अँड लॅप्रोस्कोपिक सर्जन, मेटाहील - लॅपरोस्कोपी अँड बॅरिएट्रिक सर्जरी सेंटर, मुंबई; सैफी, अपोलो आणि नमाहा हॉस्पिटल्स, मुंबई यांनी याबाबत अधिक माहिती दिली आहे. पित्ताशय हा यकृताच्या अगदी खाली स्थित एक लहान, नाशपातीच्या आकाराचा अवयव आहे. तो पित्त तयार करत नाही. पित्ताशय पित्त साठवतो आणि सोडतो. जेव्हा तुम्ही चरबीयुक्त अन्नाचे सेवन करतात तेव्हा पित्ताशय आकुंचन पावते आणि लहान आतड्यात पित्त सोडते. खाल्लेल्या अन्नाच्या पचनासाठी याची गरज असते. हे पित्त जेवणानंतर ठरावीक प्रमाणामध्ये पचनक्रियेसाठी हा पित्तरस लहान आतडय़ात सोडते. आहारात तेलकट पदार्थाचे प्रमाण जास्त झालं किंवा फायबर पदार्थाचं प्रमाण कमी झालं तर पित्तरसाची घनता वाढते. पित्त आपल्या शरीरात कसे कार्य करते पचनक्रियेवेळी भोजन पचण्यासाठी पित्ताची गरज असते. याला सामान्य भाषेत आम्ल, विष व गॅस्ट्रिक ॲसिड किंवा वैद्यकीय भाषेत याला डायजेस्टिव असे सुद्धा म्हणतात. उत्तम पचनासाठी पित्ताची पातळी योग्य असणे गरजेचे असते. पण जर पित्त वाढले तर मात्र मोठा त्रास होऊ शकतो. पित्त हे लिव्हर मध्ये तयार होते आणि पित्ताशयाच्या पिशवीमध्ये जमा होते. येथून अन्नाच्या पचनासाठी छोट्या आतड्यांमध्ये ते सोडले जाते. पित्ताच्या असंतुलनासारख्या समस्यांमुळे चरबीचे शोषण कमी होऊ शकते आणि पचनक्रियेत अस्वस्थता येऊ शकते पित्ताशयाच्या समस्या (जसे की पित्ताशयाचे खडे, पित्ताशयाचा संसर्ग इ.) पित्त प्रवाह रोखू शकतात आणि वेदना होऊ शकतात. तुम्ही पित्ताशयाशिवाय जगू शकता का? हो! जर एखाद्याला पित्ताशयाच्या गंभीर समस्या असतील (जसे की पित्ताशयाचे खडे किंवा जळजळ), तर डॉक्टर पित्ताशय काढून टाकू शकतात. यकृत त्यानंतरही पित्त तयार करेल, परंतु साठवण्याऐवजी, पित्त सतत आतड्यात जात राहील. काही लोकांना पचनक्रियेत हलके बदल जाणवू शकतात, परंतु शरीर कालांतराने ते या परिस्थितीशी जुळवून घेतात. बहुतेक लोक पित्ताशयाशिवाय जवळजवळ सामान्य जीवन जगतात. तथापि, तुम्ही पित्ताशिवाय जगू शकत नाही. चरबी पचवण्यासाठी आवश्यक जीवनसत्त्वे (ए, डी, ई आणि के) यांच्या शोषण्यासाठी हे महत्वाचे आहे. काय आहेत समस्या पित्ताच्या समस्याः जर पित्ताचे उत्पादन कमी असेल किंवा असंतुलित असेल तर ते अपचन, पोट फुगणे आणि चरबीचे शोषण कमी करते. यामुळे चरबीमध्ये विरघळणारे जीवनसत्त्वे आणि संबंधित समस्या देखील उद्भवू शकतात. पित्ताशयाच्या समस्या: पित्ताशयाचे खडे किंवा जळजळ पित्त प्रवाह रोखू शकते, ज्यामुळे वेदना, मळमळ आणि पचनक्रियेत अस्वस्थता निर्माण होते. गंभीर प्रकरणांमध्ये पित्त नलिकांमध्ये अडथळा किंवा स्वादुपिंडाचा दाह होऊ शकतो.जर तुम्हाला तीव्र ओटीपोटात वेदना, कावीळ किंवा सतत पचनक्रियेच्या समस्या येत असतील तर ताबडतोब डॉक्टरांचा सल्ला घ्या. पित्त आणि पित्ताशय एकत्र काम करतात परंतु ते एकसारखे नसतात. पित्त हे आवश्यक पाचक द्रव आहे, तर पित्ताशय हा एक अवयव आहे. तुम्ही पित्ताशयाशिवाय जगू शकता, परंतु पित्त हे जगण्यासाठी अत्यंत आवश्यक आहे. त्यांच्या भूमिका समजून घेतल्याने तुम्हाला तुमच्या पचनक्रियेच्या आरोग्याची योग्य काळजी घेण्यास मदत होऊ शकते.

# अतिमद्यपानामुळे ६०% तरुणांना भविष्यात चा धोका, अपुरा रक्तपुरवठ्यामुळे मरतील हाडांच्या उती



अव्हॅस्क्युलर नेक्रोसिस म्हणजेच ऑस्टिओ नेक्रोसिस. यामध्ये हिप्सच्या जॉईंटना रक्तपुरवठा पोहोचत नसल्यानं हाडांच्या ऊती मृत पावतात. तरुणांमध्ये मद्यपानाचे वाढते प्रमाण हे एक चिंतेचे कारण ठरत आहे. ज्याचे दीर्घकालीन परिणाम चिंताजनक आहेत. अति मद्यपानाच्या सवयींमुळे ६०% तरुणांना उतारवयात अव्हॅस्कुलर नेक्रोसिस

मद्यपान हे ५० वर्षे आणि त्यावरील वयाच्या प्रौढांमध्ये अव्हॅस्कुलर नेक्रोसिसचे प्रमुख कारण ठरत असून त्यांना प्रत्यारोपणाची आवश्यकता भासते. जास्त प्रमाणात मद्यपान केल्याने रक्तवाहिन्यांमध्ये चरबीयुक्त पदार्थ जमा होऊ शकतात. हे हाडांमधील रक्त प्रवाह अवरोधित करतात, परिणामी अव्हॅस्कुलर नेक्रोसिस होतो. काय सांगतात तज्ज्ञ पुण्यातील जहांगिर मल्टीस्पेशालिटी रूग्णालयातील ऑर्थोपेडिक आणि जॉइंट रिप्लेसमेंट सर्जन डॉ. आशिष अरबट म्हणाले की, महिनाभरात उपचाराकरिता आलेल्या रुग्णांपैकी अति मद्यपान करणाऱ्या ५० वर्षे आणि त्याहून अधिक वयाच्या सुमारे १० पैकी ५ व्यक्तींमध्ये अव्हॅस्कुलर नेक्रोसिसची समस्या आढळून येते. अशा रुग्णांना हिप रिप्लेसमेंट शस्त्रक्रियेची आवश्यकता भासते. प्रौढांमध्ये एव्हीएनच्या प्रकरणांमध्ये १५ टक्क्यांनी वाढ झाली आहे. धक्कादायक बाब म्हणजे, २५ ते ३५ वयोगटातील ६०% तरुणांना अति मद्यपानामुळे त्यांच्या वयाच्या पन्नाशीतच अव्हॅस्कुलर नेक्रोसिस होण्याची शक्यता वाढते. काय आहे प्रमुख कारण अतिमद्यपान हे नितंबाच्या अव्हॅस्कुलर नेक्रोसिसचे एक प्रमुख कारण ठरते आहे. अव्हॅस्कुलर नेक्रोसिस ही अशी स्थिती आहे जिथे रक्तपुरवठ्याअभावी हाडांच्या ऊती मरतात, ज्यामुळे सांधेदुखी आणि हाडे ठिसूळ होतात आणि तुटतात . मद्यपान आणि स्टिरॉइडचा वापर हा ६५% पेक्षा व्यक्तींमध्ये अव्हॅस्कुलर नेक्रोसिससारख्या समस्येस कारणीभूत ठरतो. अल्कोहोलच्या सेवनाने अव्हॅस्कुलर नेक्रोसिस झालेले बहुतेक रुग्ण सहसा ५० वर्षे आणि त्याहून अधिक वयोगटातील असतात. कसा वाढतो धोका? साधारणपणे ८ ते १० वर्षे सलग अल्कोहोलचे सेवन करत असल्यास आठवड्यातून ४०० मिली किंवा त्याहून अधिक मद्य आपल्या शरीरात जाते. मद्यपानामुळे सीरम ट्रायग्लिसराइड आणि कोलेस्टेरॉलची पातळी तसेच अस्थिमज्जामध्ये चरबी जमा होण्याचे प्रमाण लक्षणीयरीत्या वाढू शकते. अव्हॅस्कुलर नेक्रोसिसचा धोका इतर घटकांवर देखील अवलंबून असतो,जसे की तंबाखूचा वापर, जुनाट आजार आणि अनुवांशिकता. मद्यपानामुळे ऑस्टिओनेक्रोसिसचा धोका वाढते. याची लक्षणे म्हणजे कंबरदुखी, स्नायुंमधील कडकपणा आणि स्नायुंच्या हलचालींवर येणाऱ्या मर्यादा. या रुग्णाप्रमाणेच, नितंबाचे हाड मोडलेल्या रुग्णांवर टोटल हिप रिप्लेसमेंटने उपचार केले जातात. तरूणांमध्ये वाढतंय प्रमाण पुण्यातील अपोलो स्पेक्ट्रा रूग्णालयातील ऑर्थोपेडिक सर्जन डॉ. राजन कोठारी म्हणाले की, तरुणांमध्ये हिपच्या समस्या मोठ्या प्रमाणात आढळून येत आहेत कारण अनेकांना अव्हॅस्कुलर नेक्रोसिसचे निदान होत आहे. त्यामागची कारणे म्हणजे स्टिरॉइड्सचा गैरवापर, हाड मोडणे, नितंबाचे हाड मोडणे, रेडिएशन थेरपी, अति मद्यपान अशी आहेत. अल्कोहोलचे सेवन आणि अव्हॅस्कुलर नेक्रोसिस यांच्यात परस्परसंबंध आहे. जास्त प्रमाणात अल्कोहोलचे सेवन हा अव्हॅस्कुलर नेक्रोसिससाठी एक जोखीम घटक आहे, कारण तो हाडांमधील रक्त प्रवाह बिघडवतो, ज्यामुळे हाडांमधील पेशींचा मृत्यू होतो. त्याच्या लक्षणांमध्ये सांधेदुखी आणि स्नायुंचा कडकपणा यांचा समावेश आहे. कोणत्या वयोगटाला त्रास दरमहा, अंदाजे, २५ ते ३५ आणि त्याहून अधिक वयोगटातील १० पैकी ३ लोकांना अति मद्यपानामुळे अव्हॅस्कुलर नेक्रोसिस होतो. जास्त मद्यपान केल्यामुळे जीवनमान सुधारण्यासाठी हिप रिप्लेसमेंटची आवश्यकता असलेल्या प्रौढांमध्ये अव्हॅस्कुलर नेक्रोसिसच्या प्रकरणांमध्ये १० टक्क्यांनी वाढ झाली आहे. २३ ते ३० वयोगटातील सुमारे ४५% तरुणांना भविष्यात अव्हॅस्कुलर नेक्रोसिस चा धोका असतो. वेळीच उपचार न केल्यास, अव्हॅस्कुलर नेक्रोसिसमुळे सांध्यांचे नुकसान होऊ शकते, ज्यामुळे हिप रिप्लेसमेंट प्रक्रियेची आवश्यकता भासते.

# सरपंच स्व.संतोष देशमुख यांच्या कुटुंबाची खासदार सुप्रियाताई सुळे यांनी घेतली सांत्वन पर भेट वेळ पडली तर आम्ही अन्नत्याग करु- सुप्रियाताई सुळे

केज/प्रतिनिधी सरपंच स्व.संतोष देशमुख यांच्या कुटुंबाची खासदार सुप्रियाताई सुळे यांनी सांत्वन पर भेट घेतली आहे. देशमुख कुटुंबाचे सांत्वन करून माध्यमाशी बोलताना खासदार सुप्रियाताई सुळे सांगितले की, वेळ पडली तर आम्ही अन्नत्याग करु असे त्यांनी बोलताना स्पष्ट केले आहे.
याबाबतची सविस्तर माहिती अशी की,मंगळवार दिनांक १८ रोजी २०२५ मस्साजोग येथील युवा सरपंच कै. संतोष देशमुख यांच्या परिवारातील सदस्यांची खासदार सुप्रियाताई सुळे यांनी सांत्वन भेट घेतली आहे. यावेळी त्या बोलताना म्हणाल्या की, कोणाला पटतय का? कृष्णा आंधळे सापडू शकत नाही, त्याचा सीडीआर काढा. फोन असा जातो कुठे? कृष्णा आंधळे आणि इतर आरोपींचा सीडीआर मिळालाच पाहिजे. यासाठी आपण लढा लढू अस सुप्रिया सुळे म्हणाल्या. त्या पुढे बोलताना म्हणाल्या की, ही लढाई महिलांनी हाती घेतली पाहिजे. घ्या हातात लाटण, आमच्या घरातील पुरुषावर असे अन्याय करता? हा महाराष्ट्र अस सहन करणार नाही. तुम्ही अन्नत्याग करू नका, ही विनंती करते. वेळ पडली




तर आम्ही अन्नत्याग करू. त्या तानाजी सावंत यांचा मुलगा सापडतो, पण संतोष देशमुखांचा खुनी सापडत नाही? तो गरीब, शोषित, पीडित आहे म्हणून आवाज नाही का त्याला? जोपर्यंत त्याला न्याय मिळत नाही, दोन्ही मुलांची जबाबदारी पवारांनी घेतली आहे, असही सुप्रिया सुळे म्हणाल्या. यावेळी गावकऱ्यांनी बीडमधील आणि आजूबाजूच्या गावातील दहशतीबाबत माहिती सुप्रिया सुळेंना दिली. पोलिसांनी कशाप्रकारे हयगय करून हे प्रकरण दाबण्याचा प्रयत्न केला, याची माहितीही दिली. आजूबाजूच्या गावातील इतर गुन्ह्यांविषयीही गावकऱ्यांनी सांगितल. एकूणच बीडमधील सामाजिक आणि राजकीय परिस्थिती चिघळल्याची अनेक उदाहरण गावकऱ्यांनी सुप्रिया सुळेंना दिली असून या सर्व प्रकरणात महिला म्हणून गावकऱ्यांच्या पाठिशी असल्याच त्या म्हणाल्या. तसेच, या प्रकरणात राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडून फार मोठ्या अपेक्षा होत्या. त्यांच्या भेटीची वेळ मागितली असून बजरंग सोनावणे आणि मी जाऊन त्यांची भेट घेणार आहोत, असही सुप्रिया सुळे म्हणाल्या.
स्वर्गीय संतोष देशमुख यांच्या कुटुंबियांना न्याय मिळेपर्यंत आम्ही स्वस्त बसणार नाहीत वेळप्रसंगी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे ओटी पसरून संतोष देशमुख यांच्या कुटुंबियांना न्याय मागणार आहे असे बोलताना खासदार सुप्रियाताई सुळे यांनी स्पष्ट केले आहे.

## चिकाटी व मेहनतीने शेतकरी पुत्राचे एमपीएससी परिक्षेत घवघवीत यश, सत्यनारायण ढाकणे यांची सहाय्यक महसूलपदी निवड

केज/प्रतिनिधी केज तालुक्यातील जोला येथील शेतकरी कुटुंबातील सत्यनारायण ढाकणे यांची एमपीएससी परिक्षेत घवघवीत यश मिळवुन नुकतीच महसूल सहाय्यक पदी निवड झाल्याबद्दल ग्रामस्थांच्या वतीने भव्य सत्कार करण्यात आला व पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या वतीने महसूल सहाय्यक पदासाठी घेण्यात आलेल्या परीक्षेत शेतकरी कुटुंबातील सत्यनारायण ढाकणे यांनी घवघवीत यश संपादन केले असून या यशाने जोला ग्रामस्थांनी व कुटुंबातील नातेवाईकांनी आनंद उत्सव साजरा केला. यावेळी सत्कार करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. यावेळी बरड फाटा येथे आनंदोत्सव साजरा करण्यात आला, रामदास मुंडे, डॉ.बाबा ढाकणे,संदिप ढाकणे, पांडुरंग आंधळे, करण आबा मुंडे, दिनेश मोराळे, संपादक अशोक नागरगोजे उपस्थित होते, यांच्या सह मित्रपरिवार व नागरिकांतुन मोठ्या संख्येने अभिनंदन होत आहे.



## शिऊर ते नदीवाडी मंजूर पाणंद रस्त्याच्या कामासाठी शेतकऱ्यांचे जिल्हाधिकारी कार्यालसमोर आमरण उपोषण

लातूर : निलंगा तालुक्यातील शिऊर ते नदीवाडी हा पाणंद रस्ता मंजूर असूनही या रस्त्याचे काम गेल्या दोन वर्षांपासून रखडले आहे. रस्त्याचे काम न झाल्यास गटविकास अधिकारी, सरपंच, ग्रामसेवक, तांत्रिक सहायक यांना त्यांची पगार न काढण्याचे आदेशीत करूनही सदर रस्त्याचे काम अद्याप झालेले नाही. त्यामुळे नदीवाडी व शिऊर या दोन्ही गावच्या ग्रामस्थांना ये –जा करण्यासाठी प्रचंड त्रास सहन करावा लागत आहे. या रस्त्याचे काम तात्काळ करून देण्यात यावे, व मंजूर असलेल्या रस्त्याच्या कामाला विलंब लावणाऱ्या सरपंच, ग्रामसेवक व तांत्रिक सहायक यांच्यावर कार्यवाही करण्यात यावी, या मागणीसाठी आज १८ फेब्रुवारी पासून आठ शेतकऱ्यांनी जिल्हाधिकारी कार्यालसमोर आमरण उपोषण सुरु केले आहे. उपोषणकर्त्यांमध्ये तीन महिला शेतकऱ्यांचा समावेश आहे. मातोश्री योजने अंतर्गत शिऊर ते नदीवाडी हा पाणंद रस्ता दोन वर्षाचा कालावधी उलटला. निलंगा पंचायत समिती समोर अनेकवेळा अर्ज, विनंत्या केल्या. २४ सप्टेंबर २०२४ ला उपोषण केले असता एक महिन्याच्या आत रस्त्याचे काम पूर्ण करतो म्हणून बिडीओने लेखी आश्वासन दिले. मात्र अद्याप रस्त्याचे काम झालेले नाही. या प्रकरणात राजकीय हस्तक्षेप, दडपशाहीची भूमिका दिसून




येत असल्याचा आरोप उपोषणकर्त्यांनी केला आहे. या रस्त्याचा प्रश्न तात्काळ सोडवावा आणि रस्त्याचे काम पूर्ण करण्यात यावे, या मागणीसाठी अरुण अष्टुरे, भरत सूर्यवंशी, दिलीप सूर्यवंशी, आत्माराम सूर्यवंशी, संजय सूर्यवंशी, नामदेव तुगावे, श्रीमंत काथे, गणेश काथे, सुशीलाबाई अष्टुरे, रामदास सूर्यवंशी, भारतबाई काळे, बालाजी तुगावे, सुलोचना तुगावे, सरोजा अष्टुरे, शिवराज अष्टुरे आदी शेतकरी लातूरच्या जिल्हाधिकारी कार्यालसमोर आमरण उपोषणाला बसले आहेत.

## मेथी – मेळकुंदा येथे श्री लक्ष्मी देवी मूर्ती स्थापना प्राणप्रतिष्ठा लक्ष्मी यात्रा महोत्सवाचे आयोजन

उदगीर : उदगीरपासून जवळच असणाऱ्या कर्नाटकच्या भालकी तालुक्यातील मौजे मेथी – मेळकुंदा येथे दि. १९ ते २३ फेब्रुवारी २०२५ या कालावधीत श्री लक्ष्मी देवी मूर्ती स्थापना, प्राणप्रतिष्ठा आणि लक्ष्मी यात्रा महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. ही परंपरा शिवकालपूर्वी वर्षापासून चालत आलेली असून मागील तीन वर्षांपासून नियमितपणे हा महोत्सव उत्साहात साजरा केला जातो. या सोहळ्यामध्ये भक्तगण, स्थानिक नागरिक आणि परिसरातील इतर गावातील नागरिक मोठ्या संख्येने सहभागी होणार आहेत. श्री लक्ष्मी देवीची मूर्ती गावातील ज्येष्ठ नागरिक गोविंदराव उर्फ बाबुराव कुलकर्णी (दिवाणजी) यांच्याकडून मिळणार आहे आणि त्यांच्याच हस्ते मूर्तीची स्थापना होणार आहे. या कार्यक्रमाचे आयोजक दिलीपराव बिरादार, रघुनाथ बिरादार, व्यंकटराव बिरादार, किशोर कानेगावे, मधुकर कानेगावे, अप्पाराव रेड्डी, श्याम बिरादार, रमेश मोरे, नंदकुमार कुलकर्णी, बाबुराव पाटील, शेषेराव पाटील, तुकाराम मोरे, शिवाजीराव गुरनाळे, राजेंद्र घोरपडे, प्रकाश घोरपडे, बाबुराव बिरादार, संभाजी बिरादार, माधवराव बिरादार, देविदास बिरादार, सुनील बिरादार, ओमप्रकाश पवार, शिवाजीराव केदारे, श्रीनिवास कानेगावे, रामचंद्र रेड्डी, शिवा रेड्डी, मल्लिकार्जुन गुड्डे, धनराज गुड्डे, संगप्पा बोरोळे, शिवराज तेली, नंदकुमार बेल्लापुरे, मनोहर म्हेत्रे, शिवराज कुंभार, सतीश मोहिते हे आहेत.
विधीवत पूजा अर्चना आणि मंत्रोच्चाराने पूजा करून श्री लक्ष्मी देवीची प्राणप्रतिष्ठा करण्यात येईल. महोत्सवात लक्ष्मी देवी मूर्तीची मिरवणुक गावातून काढण्यात येईल. मिरवणूकीदरम्यान विविध धार्मिक, सांस्कृतिक कार्यक्रम, भजन, कीर्तनचे आयोजन केले आहे. महोत्सवाच्या समारोपानंतर सर्व भक्तांना महाप्रसाद वितरित करण्यात येईल.
या महोत्सवासाठी मेळकुंदा – वाडी, लंजवाड, तेलगाव, काकनाळ, लखनगाव, बोरोळ (ल), विजयनगर (गौंडगाव), शिवनी, तामगाळ, भाटसांगवी, बोळेगाव, पांढरी, हलसी, जिरगाळ, वागलगाव, खुदावंदपुर, इंचुर, भातंब्रा, रामतीर्थवाडी, भालकी इत्यादी ठिकाणाहून भक्तगण श्री महालक्ष्मीच्या दर्शनासाठी मोठ्या भक्ती भावनेने येतात. या सोहळ्याच्या यशस्वीतेसाठी कुलकर्णी, जोशी, पाटील, बिरादार, गुरनाळे, मोरे, घोरपडे, केदारे, कानेगावे, मोहिते,कदम, जाधव, पवार, तामगाळे, मरतोळे, वांजरखेडे, रेड्डी, स्वामी, तेली, बोरोळे, पारशेट्टे, गुड्डे, बागवान, गुडाकवाले, डफेदार, शेख, म्हेत्रे, लासूणे, बेल्लापुरे, गोसावी, तेली, पांचाळ (सोनार), कुंभार, वाघमारे,लोहार, गोंधळी, सूर्यवंशी, भोसले, कांबळे व सर्व गावकरी मंडळी यांचे योगदान राहणार आहे.

# आर्टिफिशियल इंटेलिजन्सच्या वापरातून कौशल्यासह सर्वांगीण विकास साधता येईल -अजित पाटील कव्हेकर.

लातूर दि.१८–२–२०२५ आधुनिक जगातील शिक्षणाचे बदलते प्रवाह पाहताना उद्याच्या प्रभावशाली जगातला जागतिक नागरिक घडवण्यासाठी आपण वैश्विक शिक्षणात सहभागी व्हावे, नव्या शैक्षणिक धोरणात दिलेल्या उद्दिष्टांबरोबर आर्टिफिशियल इंटेलिजन्सचा वापर करून कौशल्याचे विकसन करावयास हवे, शिवाय जागतिक शिक्षणाकडे जाताना वर्गातून चालणारी मूलभूत फाउंडेशनल लिटरसी पक्की करून पुढे गेलो तरच आपण जागतिक महासत्तेकडे मार्गक्रमण करू आणि त्यामुळेच खर्या अर्थाने आर्टिफिशियल इंटेलिजन्सच्या वापरातून कौशल्यासह सर्वांगिण विकास साधला येईल, असे प्रतिपादन जेएसपीएम संस्थेचे उपाध्यक्ष अजित पाटील कव्हेकर यांनी केले.
यावेळी ते महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद पुणे व जिल्हा शिक्षण प्रशिक्षण संस्था मुरुड यांच्यावतीने स्वामी विवेकानंद विद्यालय एमआयडीसी लातूर येथे तालुकास्तरीय शिक्षक क्षमता वृद्धी प्रशिक्षण टप्पा क्रमांक दोनच्या उद्घाटन प्रसंगी बोलत होते.
कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मुरुड डायटच्या प्राचार्य डॉ.भागीरथी गिरी या होत्या. प्रमुख पाहुणे म्हणून प्राचार्य गोविंद शिंदे, प्राचार्य मारुती सूर्यवंशी, मुख्याध्यापक शिवाजी सूर्यवंशी यांच्यासह सर्व सुलभकांची उपस्थिती होती.
यावेळी पुढे बोलतांना अजित पाटील कव्हेकर म्हणाले की विज्ञान, अध्यात्म याबरोबरच आर्टीफिशल इंटेलिजन्सच्या सहकार्यातून नव्या शैक्षणिक धोरणातून आपल्या शाळा, आपले सर्व विद्यार्थी समान पातळीवर शिकले पाहीजे. राष्ट्राच्या गरजा व गरजांची परिपूर्ति करणारे शिक्षण हे उद्याचे



भविष्य आहे. शिक्षकांनी सतत अपडेट राहुन डिजीटल शिक्षणाच्या सर्व प्रकारच्या 'टूल्स'चा वापर करण्याची गरज आहे. नव्या जगाची ओळख ही नव्या शैक्षणिक धोरणाचा पाया आहे. त्यामुळे त्याचे जतन करून अध्यापनाचे कार्य करावे असे आवाहन करीत सर्व प्रशिक्षणार्थ्यांना त्यांनी शुभेच्छा दिल्या.
कार्यक्रमाच्या प्रारंभी प्राचार्य गोविंद शिंदे यांनी जेएसपीएम संस्था व एकस्पर्धा परीक्षा याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. प्रशिक्षण कार्यक्रमाचे प्रास्ताविक सुलभक के.एम.वाघमारे यांनी केले.
कार्यक्रमाचे सुत्रसंचालन अब्दुलगालीब शेख यांनी केले तर आभार प्राचार्य मारूती सुर्यवंशी यांनी मानले. याप्रसंगी लातूर तालुक्यातील विविध शाळांमधून आलेले जवळपास ६०० शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

## अंनिसच्या समाज प्रबोधिनी पुरस्कारासाठी आवाहन

**महाराष्ट्राचे सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांचे हस्ते होणार पुरस्कार वितरण**


विज्ञान निर्भयता नीती

अहमदपूर :– अहमदपूर येथील महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या माध्यमातून शहीद डॉ नरेंद्र दाभोळकर यांनी समाजातील अंधश्रद्धा दूर करण्यासाठी आपले आयुष्य खर्च केले .अनिष्ट रुढी परंपरेला छेद देत समाजातील व महिलांमधील अंधश्रद्धा दूर झाल्या पाहिजे. हा हेतू घेऊन . ८ मार्च जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून विविध क्षेत्रांमध्ये पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून एक पाऊल पुरुषांच्या पुढे काम करणाऱ्या अशा अनेक महिला समाजामध्ये वावरत असतात .त्यांच्या कामाची दखल घेऊन त्यांचाही कुठेतरी सन्मान झाला पाहिजे . या पुरस्कारामुळे इतरांनाही समाजामध्ये कामकरण्यासाठी नक्कीच प्रेरणा मिळत असते म्हणून आपण सामाजिक बांधिलकी म्हणून काम करत असाल तर आपण सन्मानास पात्र नक्कीच आहेत. आपल्या कामाची दखल घेऊ प्रतिवर्षाप्रमाणे विविध क्षेत्रातील उत्कृष्ट काम करणाऱ्या महिलांचा.गेल्या १६ वर्षापासून प्रबोधनपर व्याख्यान. समाज प्रबोधिनी पुरस्कार सन्मानपत्र .ट्राफि देऊन अनेक महाराष्ट्रातील नामवंत विचारवताच्या हस्ते पुरस्कार दिला जातो . आपण केलेल्या सामाजिक कार्याची अधिक माहिती दिनांक ५. ३ .२०२५ पर्यंत मेलवर ाशसहीरक्ष २०२१ सारळश्र.लो किंवा पोस्टाने या पत्त्यावर पाठवा.

* अध्यक्ष : * उद्धव ईपर * * ७७९८९९८८२३. प्रा रत्नाकर नळेगावकर *९७६५३४१२३४ : मेघराज गायकवाड *९४२२१२१५३३. *राम तत्तापुरे सर *९७६४३३०३००. *चंद्रशेखर भालेराव : *९५११११६९०. *इमरोज पटवेकर *८०८०२११४११. *संगीत खंडागळे : *८६६८४३१२४७ *सुरेखा उपरवाड : ९९२२४८१६१५. *शोभा घोडके ९४२२६५५६९३ – कार्यालय ' तारांगण ' शहीद डॉ. नरेंद्र दाभोळकर विचार मंच, मोंढा रोड, अहमदपूर जिल्हा लातूर ४१ ३५ १५

## जेएसपीएममध्ये शिवजयंतीनिमित्त प्रसिद्ध साहित्यिक डॉ.सतीश यादव यांचे व्याख्यान

लातूर दि.१८–०२–२०२५ जेएसपीएम ग्रुप ऑफ इन्स्टिट्युट ऑफ लातूरच्यावतीने १९ फेब्रूवारी २०२५ रोजी सकाळी १०.०० वा. स्वामी विवेकानंद इन्स्टिट्युट ऑफ पॉलिटेक्निक एमआयडीसी, लातूर येथे प्रसिध्द साहित्यिक तथा व्याख्याते डॉ.सतीश यादव यांचे शिवराय समजून घेताना या विषयावरील व्याख्यान आयोजित करण्यात आलेला आहे. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जेएसपीएम संस्थेचे संस्थापक अध्यक्ष, किसान मोर्चा गुजरात व गोवा राज्याचे प्रभारी, महाराष्ट्र राज्य माजी आमदार समन्वय समितीचे राज्य उपाध्यक्ष माजी आ.शिवाजीराव पाटील कव्हेकर हे उपस्थित राहणार आहेत तर प्रमुख पाहुणे म्हणून जेएसपीएम संस्थेचे उपाध्यक्ष तथा भारतीय जनता युवा मोर्चाचे प्रदेश उपाध्यक्ष अजित पाटील कव्हेकर हे उपस्थित राहणार आहेत. त्यामुळे जेएसपीएम संस्थेच्यावतीने शिवजन्मोत्सव समारोहानिमित्त ठेवण्यात आलेल्या प्रसिद्ध साहित्यिक तथा प्रा.डॉ. सतीश यादव यांच्या व्याख्यानाला सर्व शिवभक्तांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन जेएसपीएम संस्थेचे समन्वयक संचालक निळकंठराव पवार, शैक्षणिक समन्वयक संभाजीराव पाटील, फायनान्स डायरेक्टर बापूसाहेब गोरे, समन्वयक विनोद जाधव आदींनी केले आहे.




## केज येथे शिव साम्राज्य शिवजन्मोत्सव आयोजित रक्तदान शिबिरात १०० रक्तदात्यांचे रक्तदान



केज/प्रतिनिधी केज शहरात छत्रपती शिवराय जयंती निमित्त शिव साम्राज्य जन्मोत्सव समितीने मंगळवार रोजी रक्तदान शिबिर आयोजित केले.शिबिरात १०० रक्तदात्यांनी रक्तदान केले. सामाजिक उपक्रमाने केज येथील शिवजन्मोत्सव साजरा होत आहे. शिव साम्राज्य शिवजन्मोत्सवाचे अमोल शिंदे, भैय्या शिंदे, सचिन रोडे, रवी दांगट, विलास आवाड, पपू ढगे, यशवंत रितापूरे, संजय गुंड,मुन्ना धनवडे, सागर डिकूळे,अशोक कदम, सारंग शिंदे, अतुल गुंड दुशांत लांब, अक्षय सत्वधर,आदित्य विडेकर, राहूल गुंड, अशोक रगडे, संतोष असवले अक्षय कदम, मयूर कदम, तुषार सत्वधर,रुद्र जाधव आदी सदस्यांनी शिबिराचे नियोजन केले. रक्तसंकलनासाठी माजलगाव रक्तपेढी डॉ.ज्ञानेश्वर गिलबिले, डॉ.आर.टि.जाधवर,डॉ.हनुमंत वेताळ,टेक्निशियन मोहन गायकवाड, मनीषा हुरडूके,गणेश मेंडके, गणेश नागरगोजे आदींनी सहकार्य केले.

PRINTED BY MAHESH MOTIRAM RATHOD, OWNED, PUBLISHED & EDITED BY ASHOK NAMDEVRAO HANWATE, PRINTED AT MAYUR PRINTERS, PLOT No. B-28, MIDC, NEAR BUS STAND 03, LATUR, Tq. & DIST. LATUR - 413512 (M.S.) PULISHED AT : KHADAK HANUMAN, MILIND NAGAR, LATUR TQ. & DIST. LATUR - 413512 (M.S.) EDITOR : ASHOK NAMDEVRAO HANWATE